दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com
नवी दिशा... नवे विचार.....
email:rajyaloktantra75@gmail.com
• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२६४ | बुधवार दि.२१ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### भाजप राज्यात अव्वल मात्र मुंबईसाठी दोन्ही शिवसेनेच्या कोंडीत!

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका तर पार पडल्या आता साऱ्यांच्या नजरा महापौर पदाच्या आरक्षण सोडतीवर आहेत. निवडून आलेल्या नगरसेवकांचे लक्ष महापौर पदाच्या रेसवर आहे. निवडणुकीपूर्वी आरक्षण काढल्यास पाडापाडीचे राजकारण होईल, या भीतीने नगर विकास विभागाने महापौर पदाचे आरक्षण आजवर काढले नव्हते.

## थोडक्यात...

### 'फुलराणी' नेहवालचा निवृत्तीचा निर्णय

मुंबई : भारताची फुलराणी म्हणून ओळखली जाणारी स्टार बॅडमिंटन खेळाडू सायना नेहवाल हिने निवृत्ती जाहीर केलीय. गेल्या अनेक वर्षांपासून कोर्टपासून लांब असलेल्या सानियाने अखेर निवृत्तीची घोषणा केली आहे. २०२३ मध्ये सिंगापूर ओपनमध्ये तिने शेवटची स्पर्ध खेळली होती. त्यानंतर गुडघ्याच्या दुखापतीमुळे ती बऱ्याच काळापासून कोर्टपासून दूर राहिली. दोन वर्षांपूर्वी एका पॉडकास्टमध्ये सानियाने तिच्या दुखापतीबाबत आणि निवृत्तीवर भाष्य केलं होतं. निवृत्तीचा निर्णय गुडघ्याच्या गंभीर समस्येमुळे घेण्यात आला, ज्यामुळे प्रशिक्षण घेणं अशक्य झालं होतं, असं सायना नेहवाल म्हणाली.

### मालेगावात आता वेगळीच समीकरण

मालेगाव : मालेगाव महानगरपालिकेत नवख्या इस्लाम पार्टीला मोठं यश मिळाल्यानंतर सत्तेची समीकरणे काय होणार, कोणत्याही एका पक्षाला बहुमत न मिळाल्याने इस्लाम पार्टी आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना एकत्र येण्याची चर्चा रंगत होती. परंतु आता महापालिका निवडणुकीत एकमेकांविरुद्ध लढलेले व मालेगावच्या राजकारणातील कट्टर विरोधक महापौरपदाच्या निवडणुकीसाठी एकत्र येण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. इस्लाम पार्टी व समाजवादी पार्टीने एकत्र येत तयार केलेल्या मालेगाव सेक्युलर फ्रंटच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे विरोधक एमआयएम व काँग्रेसने सत्ता स्थापनेसाठी पुढे यावे, असे आवाहन केले होते.

### वंचितच्या पाठिंब्याने शिंदेसेनेत 'उल्हास'

उल्हासनगर : उल्हासनगर महापालिका निवडणुकीत शिवसेना आणि भाजपचे समसमान नगरसेवक निवडून आल्याने, सत्तेची सूत्रे वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेसच्या हाती गेली होती. मागील दोन दिवसांपासून 'नॉट रिचेबल' असलेल्या वंचितच्या दोन नगरसेवकांनी शिवसेनेला अधिकृत पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे ४० नगरसेवकांचे बळ पाठिशी असलेल्या शिवसेनेचा महापौरपदाचा मार्ग सुकर झाला. ३७ नगरसेवक असताना भाजप विरोधी बाकावर बसेल.२९ महानगरपालिकांसाठी गुरुवार, २२ जानेवारी रोजी आरक्षण सोडत काढली जाणार आहे. त्यामुळे आता महापौर निवडीसंदर्भातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

### मुंबईत धावत्या बसला लागली आग

मुंबई : मुंबईची जीवनवाहिनी मानल्या जाणा–या पश्चिम द्रुतगती महामार्गावर २० जानेवारी रोजी सकाळी एका बसला आज भयंकर आग लागली. सुदैवाने या घटनेत कुणीही जखमी झाले नाही. या घटनेचा एक व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यात बसमधून निघणारे आगीचे लोळ वर मेट्रोच्या रुळापर्यंत पसरले होते. मालाड पूर्व येथील कुरार व्हिलेज परिसरात मेट्रो लाईन ७ च्या (रेड लाईन) पुलाखाली मंगळवारी सकाळी एका धावत्या बसला आग लागली. अपघातग्रस्त बस मालाडच्या दिशेने जात होती. रस्त्यात तिच्या इंजिनमधून अचानक धूर येऊ लागला. त्यानंतर काही क्षणांतच बसने पेट घेतला.

### आयोगाच्या कार्यालत ईव्हीएमविरोधात राडा

मुंबई ;राज्यात महापालिका निवडणुकांच्या निकालानंतर आता जिल्हा परिषद निवडणुकांची घोषणा झाली आहे. मात्र, जिल्हा परिषद निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्याची मागणी जोर धरत आहेत. विधानसभा, नगरपालिका आणि आता महापालिका निवडणुकीत भाजपला मोठं यश मिळाल्याने पुन्हा एकदा ईव्हीएम मशिनचा मुद्दा उपस्थित करत बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी होत आहे.मुंबईतील राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जाऊन ईव्हीएम हटाव देश बचाओ अशी घोषणाबाजी केल्याने चांगलाच गोंधळ उडाला.

### प्रणिती शिंदेंनी कार्यकर्त्यांचं वाटोळं केलं

सोलापूर ;मी काँग्रेसचा होतो हे सांगण्यासाठी प्रणिती शिंदेच्या सर्टिफिकेटची आवश्यकता नाही. प्रणिती ताईंनी सुशीलकुमार शिंदे साहेबांनी मोठी केलेली काँग्रेस संपवण्याचे काम केलं. आयुष्यभर कष्ट करून ज्या कार्यकर्त्यांना शिंदे साहेबांनी सोबत घेतलं, त्या कार्यकर्त्यांचे वाटोळं प्रणिती शिंदेनी केलं, अशा शब्दात जयकुमार गोरेंनी प्रणिती शिंदेंवर बोचरी टीका केली. ज्यावेळी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना त्यांची गरज होती त्या त्यांना वाऱ्यावर सोडून गेल्या. त्यामुळे दोन नगरसेवक आल्यावर देखील समाधान वाटतय असे जयकुमार गोरे म्हणाले .

# शेती क्षेत्रावर भरीव तरतूद करा...!

## उद्योगतज्ज्ञ, शेतकरी संघटना आणि शेतकरी यांची अपेक्षा

दिल्ली । वृतसंस्था

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन १ फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्प संसदेत सादर करतील. या अर्थसंकल्पात शेती क्षेत्रातील आव्हानांवर मात करण्यासाठी भरीव तरतूद करावी, अशी अपेक्षा उद्योगतज्ज्ञ, शेतकरी संघटना आणि शेतकरी करत आहेत. देशातील शेती क्षेत्रासमोरील अरिष्ट्ये दिवसेंदिवस गंभीर होत आहे. या पार्श्वभूमीवर सरकारकडे गुंतवणूक आधारित तरतूद वाढवण्याची मागणी केली जात आहे. यामध्ये प्रामुख्याने कृषी पायाभूत सुविधा, संशोधन आणि विकास, हवामान बदल अनुकूल शेती आणि डिजिटल शेती या क्षेत्रांत अधिक निधी देण्याची अपेक्षा आहे.**



शेतकऱ्यांची बाजारातील सौदाशक्ती वाढीसाठी तसेच उत्पन्नाची हमी आणि खर्चात बचत करण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था आणि इतर शेतकरी एकत्रीकरण मॉडेल्सना सरकारने प्रोत्साहन द्यावे,अशी मागणी केली जात आहे. तसेच शेती यांत्रिकीकरण आणि डिजिटल शेतीसाठी सार्वजनिक–खाजगी भागीदारी मॉडेलचा अधिक प्रभावी वापर करण्याची मागणी होत आहे. तंत्रज्ञान आधारित विशेषत: ड्रोन, सेन्सर, डेटा प्लॅटफॉर्म, एग्रीटेक स्टार्टअप्स यांसाठी अधिकची भांडवली तरतूद करण्यात येईल, अशी आशा जाणकार व्यक्त करत आहेत. हवामान बदलाच्या संकटाने शेतकरी जेरीस आले आहेत. त्यामुळे हवामान बदल अनुकूल शेतीवर भर देण्याची गरज व्यक्त केली जात आहे. तसेच हवामान बदल अनुकूल शेतीवर भर दिला नाही तर मात्र पुढील १५ वर्षांत कृषी क्षेत्राला मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागेल. त्यामुळे बदलते हवामान, दुष्काळ, अतिवृष्टी आणि तापमानवाढ यांचा थेट परिणाम उत्पादनावर होईल, असा इशारा अभ्यासकांनी दिला आहे. उद्योग तज्ज्ञांचे म्हणणे आहे की सध्याचा कृषी अर्थसंकल्प मोठ्या प्रमाणावर डीबीटी (थेट लाभ हस्तांतरण), हमीभाव आणि निविष्ठा अनुदानावर यावर केंद्रित आहे.परंतु दीर्घकालीन विकासासाठी आवश्यक असलेला गुंतवणूक खर्च तुलनेने खूपच कमी आहे. त्यामुळे कृषी ▶▶ पान २ वर

# महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी आज सुनावणी

## दोन्ही राज्यांचे सुनावणीकडे लक्ष ८ वर्षांनंतर पहिलीच सुनावणी

बेळगाव । वृतसंस्था

**महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्नी अखेर आठ वर्षांनंतर बुधवार दि. २१ जानेवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या दिवशी मूळ दाव्यावर सुनावणी होईल. त्याकडे सीमावासीयांचे लक्ष लागून आहे.**




सीमाप्रश्नी महाराष्ट्राच्या वतीने दावा मेन्शन करण्यात आला होता. वरिष्ठ विधिज्ज्ञ अॅड. सी. एस. वैद्यनाथन आणि अॅडव्होकेट ऑन रेकॉर्ड शिवाजी जाधव यांनी सर्वोच्च न्यायालयात सीमाप्रश्नी लवकरात लवकर सुनावणी व्हावी, अशी विनंती केली होती. न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती आलोक आराध्ये यांनी ही विनंती मान्य करून बुधवारी सुनावणी निश्चित केली आहे. या दिवशी मूळ दाव्यावरच सुनावणी होण्याची शक्यता आहे. अनेक लढे, आंदोलने करूनही न्याय मिळत नसल्यामुळे २००४ मध्ये महाराष्ट्र सरकारने सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात दाखल केला आहे. यामध्ये केंद्र सरकार प्रतिवादी क्रमांक एक असून कर्नाटक सरकार प्रतिवादी क्रमांक दोन आहे. सुरवातीपासूनच दोन्ही प्रतिवादींनी या दाव्यात वेळकाढूपणा केला आहे. २०१३ मध्ये या याचिकेवर साक्षी, पुरावे तपासणे आणि वादाचे मुद्दे निश्चित करण्यासाठी कोर्ट कमिशनची नियुक्ती ▶▶ पान २ वर

# बीड जिल्ह्यात महादेव ॲपवर सट्टा

## कोट्यवधीची उलाढाल, परदेशी कनेक्शनची शक्यता

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील नेकनूरपासून जवळच असलेल्या कारेगव्हाणमध्ये लाखो रुपयांची उलाढाल करणारा ऑनलाईन सट्टा सुरु असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना झाल्यानंतर जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांच्या आदेशावरून बीड मुख्यालयातील दोन पोलिसांनी मध्यरात्री एक ते दोन वाजण्याच्या सुमारास कारेगव्हाण परिसरात छापा मारला असता लोटस ऑनलाईन



गेमद्वारे सट्टा सुरु असल्याचे उघडकीस आले. या वेळी १५ मोबाईलसह चार लॅपटॉप जप्त करत चौघा जणांना जेरबंद केले. मोबाईल आणि लॅपटॉपच्या



प्राथमिक तपासणीत या सर्व खेळात कोट्यवधी रुपयांचे बेकायदेशीर आर्थिक व्यवहार झाल्याचे सांगण्यात येते. गुन्हा दाखल ▶▶ पान २ वर

## गोविंद पानसरे हत्या प्रकरणातील आरोपीचा मृत्यू

कोल्हापूर । प्रतिनिधी

पुरोगामी नेते, विचारवंत गोविंद पानसरे खून प्रकरणातील संशयित आरोपी समीर गायकवाड याचा मृत्यू झाला आहे. सांगलीतील राहत्या घरी समीर गायकवाड याचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. प्राथमिक अंदाजानुसार, समीर गायकवाड याचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे.



१६ फेब्रुवारी २०१५ रोजी कोल्हापूर येथे झालेल्या गोविंदराव पानसरे यांच्या हत्या प्रकरणी समीर गायकवाड संशयित आरोपी होता. समीर गायकवाड जामिनावर बाहेर होता. सांगलीमध्ये राहत्या घरी त्याचा मृत्यू झाला आहे. १६ सप्टेंबर २०१५ रोजी समीर गायकवाड याला पानसरे यांच्या हत्या ▶▶ पान २ वर

# काका पुतण्याच्या राष्ट्रवादीचे अंडरस्टँडिंग शक्य तिथे घड्याळ, शक्य तिथे तुतारी



पुणे । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसकडून घड्याळ आणि तुतारी वाजविणारा माणूस या पक्ष चिन्हांचा सोयीनुसार वापर करण्यात येणार आहे. जिथे जे चिन्ह फायद्याचं ठरेल तिथे ते चिन्ह वापरून उमेदवार उभे केले जाणार आहेत. महापालिका निवडणुकांनंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी एकत्र बैठक करुन ही स्ट्रॅटेजी ठरवली आहे. पुणे जिल्ह्यात आणि ▶▶ पान २ वर

### भाजपला कितपत स्वीकारणार

राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासूनच या पक्षाच्या सुभेदारांना सत्तेची उब मिळत राहिली. त्यामुळे जेव्हा विरोधात बसायची वेळ आली तेव्हा हे सुभेदार संघर्षात कमी पडले. त्यामुळं शरद पवार भाजपशी दोन हात करत असताना सत्ता भोगलेले त्यांचे सुभेदार मात्र त्यांना सोडून भाजपच्या वळचणीला गेले. आता शरद पवाराच्या पक्षालाच अस्तित्वासाठी सत्तेची उब गरजेची वाटतेय. त्यातून अजित पवारांशी जुळवून घेण्यात आलायं. अर्थात भाजपच्या नेतृत्वाला हे दोन्ही डगरींवर पाय ठेवणं कितपत चालेल हे लवकरच कळेल.

# अडीच वर्षासाठी शिंदेंचे दबावतंत्र

## मुंबईच्या महापौर पदासाठी दिल्लीत खल

मुंबई । प्रतिनिधी

एकनाथ शिंदे हे मुंबईच्या महापौर पदासाठी आग्रही असल्याची माहिती आहे. तर दुसरीकडे भाजपला हा मुंबईत सर्वाधिक जागा जिंकून एक नंबरचा पक्ष ठरला आहे. पण भाजपला बहुमत मिळवता आलेला नाही. असं



असलं तरी भाजप आणि शिवसेनेच्या महायुतीला ११८ जागांवर यश मिळालं आहे. दोन्ही पक्षांमध्ये आता महापौर पदासाठी रस्सीखेच सुरु आहे. शिंदेंकडून भाजपवर महापौर पदासाठी दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जात असल्याची चर्चा आहे. यानंतर आता दिल्लीतून निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे .

राज्यातील भाजप नेत्यांची आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या नेत्यांची आज दिल्लीत बैठक होणार आहे. ▶▶ पान २ वर

## तमिळनाडूत राष्ट्रगीतावरून ड्रामा राज्यपाल विधानसभेतून बाहेर पडले


चेन्नई । वृतसंस्था

तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी आणि मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या सरकारमधील वाद आता टोकाला पोहोचला आहे. विधानसभेच्या अधिवेशनादरम्यान राष्ट्रगीताचा अवमान झाल्याचा आरोप करत राज्यपालांनी थेट सभागृहातून बाहेर पडणे पसंत केले. तामिळ गीतासोबतच राष्ट्रगीतही वाजवले जावे, ही राज्यपालांची मागणी विधानसभा ▶▶ पान २ वर

# राज्यात १५ लाख नोकऱ्या उपलब्ध होणार मुख्यमंत्री फडणवीस यांची मोठी घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

परदेशी गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हेच खरे गेट वे ऑफ इंडिया असल्याचे मत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. स्वित्झर्लंडच्या दावोस येथे आयोजित करण्यात आलेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीत त्यांनी हे विधान केले. महाराष्ट्र हे भारताच्या ▶▶ पान २ वर



# नदी पुनरुज्जीवनासाठी महाराष्ट्राचे मोठे पाऊल

## देशातील पहिल्या राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाचे मंत्री पंकजा मुंडे यांनी केले सादरीकरण

नवी दिल्ली । वृतसंस्था

**महाराष्ट्रातील नद्यांना प्रदूषणाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी राज्य सरकारने एक ऐतिहासिक पुढाकार घेतला असून, यासाठी 'राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण' स्थापन करण्याची महत्त्वपूर्ण संकल्पना मांडली होती. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय विभाग आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज नवी दिल्ली येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन यासंदर्भातील देशातील पहिल्या प्रस्तावाचे सादरीकरण केले.**



या विशेष बैठकीत पंकजा मुंडे यांनी राज्यातील जल आणि पर्यावरण प्रकल्पांच्या सद्यस्थितीवर सविस्तर चर्चा केली. नद्यांच्या स्वच्छतेसाठी केंद्र सरकारच्या मदतीसोबतच राज्याची स्वत:ची एक स्वतंत्र यंत्रणा आणि नियोजन असणे काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले. श्रीमती मुंडे यांनी देशातील अनेक नद्या विविध राज्यांतून प्रवाहित होतात. जर प्रत्येक राज्याने आपल्या भौगोलिक सीमेतील नदीपात्राच्या स्वच्छतेसाठी आणि पुनरुज्जीवनासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी व सुनियोजित योजनांची अंमलबजावणी केली, तर नद्यांचे पूर्णतः प्रदूषणमुक्त होण्याचे ▶▶ पान २ वर

# संभाजीनगरमध्ये गँगवॉरचा थरार!

## गावठी कट्टा काढत गोळीबार

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगरच्या मुकुंदवाडी रेल्वे स्टेशन परिसरात मोबाइल आणि मुलीच्या वादातून कुख्यात गुन्हेगारांच्या टोळ्यांमध्ये गँगवॉर उफाळून आला. सराईत गुन्हेगारांनी थेट गोळीबार करत एका तरुणाचा खून करण्याचा प्रयत्न केल्याने परिसरात दहशत निर्माण झाली. आरोपींनी घरावर दगडफेक केली, तसेच मध्ये पडणाऱ्या नागरिकांनाही जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या.सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. पुंडलिकनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करत शुभम जाटसह सात आरोपींना अटक केली आहे.

प्रत्यक्षदर्शीने दिलेल्या माहितीनुसार, पहाटेच्या सुमारास घराच्या दारावर मोठा दगड आढळल्याचा आवाज आला. अनेक लोक बाहेर शिवीगाळ करत होते. बाहेर घेण्यासाठी ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२० जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | | |
|---|---|---|
| **गहू: १६.०० क्विंटल** | | |
| किमान | कमाल | सरासरी |
| २,४९१ | २,७६८ | २,६३० |
| **ज्वारी/हायब्रिड : २७.५० क्विंटल** | | |
| २,०५० | ३,८०० | ३,१९६ |
| **मका/लोकल: ३.५० क्विंटल** | | |
| १,५०० | १,५०० | १,५०० |
| **तूर : १०८.०० क्विंटल** | | |
| ६,६०१ | ७,३०० | ७,०८४ |
| **उडीद : २५.५० क्विंटल** | | |
| ५,४०० | ५,९५१ | ५,७६८ |
| **बाजरी: २३.५० क्विंटल** | | |
| ३,००० | ३,२०० | ३,०९० |
| **मुग: १.०० क्विंटल** | | |
| ५,२०१ | ५,२०१ | ५,२०१ |
| **सोयाबीन: ५.५० क्विंटल** | | |
| ५,२०० | ५,२०० | ५,२०० |
| **हरभरा: ०.५० क्विंटल** | | |
| ६,८०० | ६,८०० | ६,८०० |

cmyk



अग्रलेख

# भाजप राज्यात अव्वल मात्र मुंबईसाठी दोन्ही शिवसेनेच्या कोंडीत!

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका तर पार पडल्या आता सा-यांच्या नजरा महापौर पदाच्या आरक्षण सोडतीवर आहेत. निवडून आलेल्या नगरसेवकांचे लक्ष महापौर पदाच्या रेसवर आहे. निवडणुकीपूर्वी आरक्षण काढल्यास पाडापाडीचे राजकारण होईल, या भीतीने नगर विकास विभागाने महापौर पदाचे आरक्षण आजवर काढले नव्हते. आता निवडणूक पार पडल्यानंतर या पदासाठी नगर विकास विभागाच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने महापौर पदाच्या आरक्षणाची सोडतच काढली नसल्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. निवडणुकीपूर्वी ही सोडत काढणे अपेक्षित होते; परंतु राज्य सरकारने त्यावर निर्णयच घेतला नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी महापौर, नगराध्यक्ष पदांची सोडत नगर विकास विभाग तर जिल्हा परिषद अध्यक्षांची सोडत ही ग्राम विकास विभागाकडून काढण्यात येते.

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीची घोषणा १५ डिसेंबरला झाली. तत्पूर्वी महापौर पदाच्या आरक्षणाची सोडत निघणे अपेक्षित होते. नगर विकास विभागाने त्यानुसार तयारीही केली होती; पण वरिष्ठ पातळीवरून आदेशच देण्यात आला नाही. चक्राकार पद्धतीने आरक्षण काढण्याची कायद्यात तरतूद आहे; पण सरकारकडून अद्याप आरक्षणाच्या सोडतीवर काही मार्गदर्शक तत्त्वे कळविण्यात आलेली नाहीत. सोडतीची सगळी तयारी करण्यात आली आहे. बुधवारी आरक्षणाची सोडत काढली जाण्याची शक्यता आहे. आरक्षण नेमके कोणाला सुटते याची उत्सुकता आहे. महापालिका निवडणुकांचा निकाल लागल्यावर २ आठवड्यांत महापौर निवडावा लागतो. बुधवारी (आज) मंत्रालयात सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमोर महापौर पदाच्या आरक्षणाची सोडत निघण्याची शक्यता आहे. महापौर पदाचे आरक्षण चक्राकार पद्धतीने काढण्यात येते. समाजातील सर्व घटकांना महापौर पदाची संधी मिळावी, यासाठी चक्राकार पद्धतीने आरक्षणाची सोडत काढली जाते. चक्राकार पद्धतीसाठी २००६ मध्ये राज्य सरकारने नियम तयार केले आहेत. समान संधीचे तत्त्व त्यासाठी वापरले जाते. सर्वसाधारण पुरुष व महिला, ओबीसी पुरुष व महिला, अनुसूचित जाती, जमातीमध्ये अशाच पद्धतीने संधी दिली जाते. चक्राकार पद्धतीने आधीच्या वर्षी ज्या गटास संधी मिळालेली असते ते वगळून आरक्षण काढले जाते. मुंबई महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी कोणाची वर्णी लागणार याकडे सा-या राज्याचे लक्ष लागले आहे. या पदासाठी पडद्यामागे जोरदार हालचाली सुरू आहेत. या पदावर आपलाच नगरसेवक असावा, असे भाजप आणि शिंदे शिवसेनेला वाटते तर २५ वर्षे भोगलेले पद आपल्या हातून निसटू नये, असे ठाकरे शिवसेना व मनसेची इच्छा आहे; पण मतपेटीने ठाकरे शिवसेना व मनसेला नाकारले आहे तरीसुद्धा त्यांच्या मनात थोडीशी धुगधुग आहे. काहीतरी चमत्कार घडेल, असे त्यांना वाटते. त्यासाठीच आता पडद्यामागे जोरदार हालचाली सुरू आहेत. या पदासाठी महायुतीकडे स्पष्ट बहुमत असताना शिंदे शिवसेना गटाने आपली 'बार्गेनिंग पॉवर' वाढवत अडीच वर्षासाठी महापौर पदाची मागणी केल्याचे बोलले जाते. 'देवाची इच्छा असेल तर आपला महापौर होऊ शकतो', असे विधान उद्धव ठाकरे यांनी केल्यामुळे तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ऐनवेळी वाटाण्याच्या अक्षता लावतील, या भीतीने एकनाथ शिंदे यांनी आपले नगरसेवक पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवल्याचे समजते. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी खबरदारीचा उपाय म्हणून आपल्या सर्व २९ नगरसेवकांना वांद्रे येथील 'ताज लँड्स एन्ड' या पंचतारांकित हॉटेलमध्ये हलवले आहे. सर्व २९ नगरसेवकांना बुधवारी ३ वाजेपर्यंत हॉटेलमध्येच राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री फडणवीस सध्या दावोस दौ-यावर आहेत. ते परत आल्यानंतरच महापौर पदाचा निर्णय होऊ शकतो. दरम्यान ठाकरे गटानेही शिंदेंच्या नगरसेवकांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न सुरू केला आहे म्हणे. मुंबई महापालिकेत भाजपचे ८९ नगरसेवक निवडून आले असले तरी बहुमताचा आकडा गाठण्यासाठी त्यांना शिंदे सेनेच्या २९ नगरसेवकांची मदत घ्यावीच लागणार आहे. मुंबईचा महापौर काँग्रेस निश्चित करेल, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटल्याने महापौर पदाचे त्रांगडे आणखी वाढले आहे. मुंबईचा महापौर शिवसेनेचा किंवा ठाकरे बंधूंचा व्हावा, यापेक्षा भाजपचा होऊ नये, अशी सगळ्यांची भावना आहे. देवाची इच्छा असेल तर शिवसेनेचा महापौर होऊ शकतो, असे उद्धव ठाकरे शनिवारी म्हणाले. ठाकरे बंधूंनी मोबाईलवर चर्चाही केली, असे सांगून संजय राऊत म्हणाले, आम्ही सध्या तटस्थपणे या सगळ्या हालचालींकडे पाहत आहोत; पण पडद्यामागे ब-याच गोष्टी घडत आहेत. स्वत:च्या बळावर भाजप आपला महापौर बसवू शकत नाही, हे स्पष्ट झाल्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्याला अडीच वर्षांचे महापौरपद मिळावे यासाठी भाजपसमोर प्रस्ताव ठेवल्याचे समजते मात्र, शिंदे गटाकडून असा कोणताही प्रस्ताव आला नसल्याचे भाजपचे नेते, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे. दुसरीकडे शिंदेंचे नगरसेवक ज्या हॉटेलमध्ये वास्तव्यास आहेत तेथे जेवायला जाण्याची तयारी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे म्हणे. आमचे जवळपास २० नगरसेवक नवखे आहेत. त्यांना महानगरपालिकेचे कामकाज कसं चालते याबद्दल काही माहिती नाही. त्या संदर्भात आम्ही नगरसेवकांसाठी दोन दिवसीय शिबिर घेतले आहे. त्यासाठी हे नगरसेवक हॉटेलमध्ये आहेत. हे सगळे ठाकरेंच्या नगरसेवकांना हरवून आले आहेत. आम्हाला हॉटेल पॉलिटिक्स करायची गरज नाही. आम्ही महायुती म्हणून लढलो आहोत आणि जिंकलो आहोत.

पाठीत खंजीर खुपसण्याची आमची भूमिका नाही. महायुती म्हणूनच आम्ही सत्तेत येणार, असे स्पष्टीकरण शिंदे गटाच्या प्रवक्त्या शीतल म्हात्रे यांनी दिले आहे. दरम्यान महापौर पदाची आरक्षण सोडत लांबली असून आता त्यासाठी २२ जानेवारीचा मुहूर्त साधण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे त्यामुळे शिंदे यांच्या नगरसेवकांचा हॉटेलमधील मुक्काम वाढण्याची शक्यता आहे. महापौर आरक्षण सोडत लांबल्याने संभ्रम आणखी वाढला आहे. युतीबाबतच्या वावड्यात आणखी भर पडत आहे. महापौर पदाबाबत देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांच्यात चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भाकरी फिरवणार, असेही बोलले जात आहे. आरक्षण जाहीर झाल्यानंतर अन्य महानगरपालिकांतही उलथापालथीला वेग येईल.



## स्व.आवाड यांच्या जयंतीनिमित्त पुरस्कार प्रदान सोहळा वितरण

घनसावंगी । प्रतिनिधी

मानवी हक्क अभियान राष्ट्रीय अध्यक्ष कर्मवीर एकनाथ आवाड यांची ७० वी जयंती निमित्त मानवी हक्क अभियान राष्ट्रीय अध्यक्ष मा, प्रा, डॉ, मिलिंद आवाड यांच्या अध्यक्षतेखाली व मानवी हक्क अभियान जालना जिल्हा अध्यक्ष अंकुश सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत लहुजी, छत्रपती शिवाजी, महाराज फुले, शाहु, आंबेडकर, अण्णांभाउ साठे, यांच्या विचारधिन राहून सामाजिक बांधिलकी जोपासून दलित, आदिवासी, गायरानधारक, भूमिहिन, कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, ऊसतोड कामगार वंचित, उपेक्षित, ईमारत बांधकाम यांच्या विविध प्रश्नांवर घटनेच्या माध्यमातून लोकशाही मार्गाने मानुस म्हणून जिवन जगता यावे यासाठी जनजागृती करुन शासन दरबारी संघर्ष करुन लोंकांच्य प्रशनाना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्नशिल भारती जनता पार्टी अनुसूचित जाती व जमाती घनसावंगी तालुका अध्यक्ष परमेश्वर सोनवणे वडीरामसगांव तसेच मानवी हक्क अभियान घनसावंगी तालुका सचिव गोरख थोरात या दोघांना संघर्षशिल कार्यकर्ता सन्मान पुरस्कार दिनाक १९ जानेवारी २०२६ रोजी परभणीः जिल्ह्यातील पार्थी तालुका येथे मानवी हक्क अभियान राष्ट्रीय अध्यक्ष मा, प्रा, डॉ, मिलिंद आवाड यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला तसेच गोरख थोरात यांची मानवी हक्क अभियान घनसावंगी तालुका सचिव नियुक्ती करण्यात आली या अनुषंगाने मानवी हक्क अभियान अध्यक्ष अंकुश सोनवणे यांनी त्यांचे अभिनंदन करुन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

# शहरातील उर्वरित विकास कामे पूर्ण करणार-भास्कर आबा दानवे

## विजयी नगरसेवकांनी दिली विकासाची ग्वाही

जालना । प्रतिनिधी

**जालना शहर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष तथा नवनिर्वाचित नगरसवेक भास्कर आबा दानवे यांच्यासह सौ. सुशीला भास्कर दानवे, सौ. ज्योती रवी सले, सौ. पद्मा अजित मानधनी व श्री. कल्याण जगदीश भदनेकर हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले असून, या विजयाच्या निमित्ताने शिक्षक कॉलनीच्या वतीने भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.**

यावेळी भास्कर आबा दानवे यांनी बोलताना सांगितले की, जनतेने दिलेला मतदान रूपी कौल हा केवळ सन्मान नसून, मोठी जबाबदारी असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. शिक्षक कॉलनी परिसरातील प्रलंबित सर्व विकासकामे तातडीने व टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. मागील काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे शिक्षक कॉलनीतील अनेक घरांमध्ये पाणी शिरून मोठे नुकसान झाले होते. भविष्यात अशी परिस्थिती टाळण्यासाठी पावसाचे पाणी योग्य पद्धतीने डायव्हर्जन करून सीना नदी व कुंडलिका नदीमध्ये सोडण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात येईल, असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले. तसेच कॉलनीतील दूषित पाण्याच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यात येतील. स्वच्छ व शुद्ध पाणीपुरवठ्यासाठी लाईन तपासणी, दुरुस्ती व आवश्यक तांत्रिक सुधारणा केल्या जातील. नियमित पाणीपुरवठा कसा करता येईल, यासाठी महानगरपालिकेच्या संबंधित विभागांशी समन्वय साधून योजना राबवली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. निवडणूक प्रचारादरम्यान शिक्षक कॉलनीतील नागरिकांनी दिलेला निःस्वार्थ पाठिंबा व मतदान रूपी विश्वास आम्ही कधीही विसरणार नाही, असे सांगत प्रचारात दिलेले प्रत्येक आश्वासन प्रत्यक्ष पूर्ण करण्याचा निर्धार यावेळी सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांनी केला. यावेळी जीवन सले, सरचिटणीस अमोल कारंजेकर, कपिल दहेकर, अजित मानधनी, विठ्ठल रुक्मिणी समिती प्रमुख भगवान नाना आनंदे, कौतिक जंजाळ सर, भोसले सर, श्रीकांत सपकाळ आदी मान्यवर उपस्थित होते.





## सोशल मीडियाच्या युगातही वर्तमान पत्रांची विश्वासार्हता कायम-लोणीकर

मंठा । प्रतिनिधी

**सोशल मीडियाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात आज ही वर्तमान पत्रांची विश्वासार्हता कायम असल्याने आजही सर्वसामान्यांची विश्वासार्ह माध्यमे असल्याचे प्रतिपादन राहुल लोणीकर यांनी केले. पत्रकारितेत काळानुसार बदल आवश्यक असले तरी बातमीतील सत्यता व विश्वासार्हता जपणे हे पत्रकारांचे प्रथम कर्तव्य असल्याचे मत त्यांनी यावेळी मांडले.**

मंठा येथील माऊली इंग्लिश स्कूलमध्ये मराठी पत्रकारितेचे जनक 'दर्पण'कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भारतीय जनता पक्षाचे माजी तालुका अध्यक्ष सतीश निर्वळ यांनी आयोजित केलेल्या पत्रकार सन्मान सोहळ्यात अध्यक्षीय भाषण करतांना लोणीकर बोलत होते. लोणीकर म्हणाले की, व्हॉट्सअ‍ॅप व सोशल मीडियावर फिरणाऱ्या अनेक बातम्या शंकास्पद असतात. कॉपीपेस्ट व एडिटिंगच्या जमान्यातही हातात वर्तमानपत्र घेऊन बातमी वाचण्याचा अनुभव वेगळाच असतो. त्यामुळे प्रिंट मीडियाचे महत्त्व आजही अबाधित आहे. अभ्यासू व प्रामाणिक पत्रकारांच्या बातम्यांना समाजात आजही मान मिळतो, हे वास्तव त्यांनी अधोरेखित केले. इलेक्ट्रॉनिक, प्रिंट व सोशल मीडियातील वाढत्या स्पर्धेत पत्रकार निर्भिड व भयमुक्त असणे अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे माजी तालुका अध्यक्ष सतीश निर्वळ,तालुका अध्यक्ष नितीन राठोड,माजी उपसभापती राजेश मोरे,नगरसेवक शेषनारायण दवणे,गजानन निर्वळ, दत्तराव निर्वळ,पंडितराव बोराडे,दिनेश जोशी,पत्रकार संरक्षण समितीचे अध्यक्ष राजेभाऊ भुतेकर,,सचिव अतुल खरात, कार्याध्यक्ष गजानन माळकर,संदीप गायकवाड,आशिष मोरे यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी,इतर पत्रकार माऊली ग्रुपचे सर्व शिक्षक व इतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी भेटवस्तू,शाल व हार देऊन पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.

# पान १ वरून...

## शेती क्षेत्रावर भरीव

क्षेत्रातील संशोधन व विकासावर भर द्यावा. तसेच साठवणूक प्रक्रिया, डिजिटल शेती उपाय आणि निर्यातक्षम उत्पादन यावर अर्थसंकल्पात भर द्यावा, अशी गरज व्यक्त केली जात आहे. तसेच केवळ तातडीच्या समस्यांवर उपाय न करता, दीर्घकालीन शाश्वततेसाठी संरचनात्मक सुधारणा आवश्यक असल्याचे तज्ञाचे मत आहे. तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नातील वाढ, मातीचे आरोग्यात सुधारणा आणि हरितगृह वायू उत्सर्जन कमी करणे यासाठी ठोस धोरण अपेक्षित असल्याचे सांगितले जात आहे. देशातील साठवणूक आणि वाहतूक व्यवस्थेच्या अभावी फळे आणि भाज्यांची २० टक्के नासाडी होते. दुसरीकडे खाद्यतेल व कडधान्यांसाठी आयातीवर मोठे अवलंबित्व आहे. तसेच वाढते हवामान धोके आणि कुपोषणाची समस्या, राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा, पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना, पंतप्रधान पोषण योजना यांमुळे अन्न सुरक्षा मजबूत झाली असली, तरी पुरवठा साखळीतील त्रुटी कायम आहेत.शेती क्षेत्राचा देशाच्या जीडीपीमध्ये सुमारे १८.२ टक्के वाटा असून, जवळपास निम्मी लोकसंख्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे या क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे २०२६-२७ चा अर्थसंकल्प शेतीसाठी दूरगामी, शाश्वत आणि गुंतवणूक-केंद्रित असावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मागील काही वर्षांतील अर्थसंकल्प पाहिला असता कृषी क्षेत्रातील खर्चाचे स्पष्ट चित्र समोर येते. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये कृषी आणि संलग्न क्षेत्रांसाठी सुमारे १.५२ लाख कोटी रुपये तरतूद करण्यात आली होती, तर आर्थिक वर्ष २०२६ मध्ये हा आकडा कमी होऊन १.३७ लाख कोटी रुपये झाला. मात्र, किमान आधारभूत किंमत आणि विविध अनुदानांवर होणारा खर्च ३.९१ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे दिसून येते.

------------

## बीड जिल्ह्यात महादेव

करण्याची प्रक्रिया नेकनूर पोलीस ठाण्यात सुरू होती. ग्रामीण भागात एवढ्या मोठ्या प्रमारात सट्टा खेळला जात आल्याने एकच खळबळ उडाली आहे. गेल्या काही महिन्यांपासून कोगव्हाण परिसरामध्ये लोटस ऑनलाईन गेमच्या माध्यमातून सट्टा चालवला जात होता. याची माहिती मुख्यालयाच्या दोन पोलिसांना झाली. त्यांनी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना याची माहिती देत मध्यरात्री कारेगव्हाण परिसरातील एका कोपीत छापा मारला. त्या वेळी कंधारे नावाचे तीन आणि खिल्लारे नावाचा एक असे चौघे त्याठिकाणी महादेव ॲप लोटस द्वारे ऑनलाईन सट्टा चालवत होते. त्यांच्याकडे तब्बल दोनशेपेक्षा अधिक बैंक अकाऊंट त्याचबरोबर महादेव ॲपचे अकाऊंट मिळून आले आहे. त्या अकाऊंटची तपासणी चालू असून यात कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाल्याचे प्रथमदर्शी दिसून येत आहे. रात्री छापा टाकल्यानंतर पंधरा मोबाईलसह चार लॅपटॉप पोलिसांनी ताब्यात घेतले असून चारही आरोपींना नेकनूर पोलीस ठाण्यात आणण्यात आले आहे. मोबाईल तपासल्यानंतर या सट्टा चालवणाऱ्या आरोपींचा बेट परदेशात कनेक्शन असल्याचे उघड होत आहे. रात्री एक ते दोन वाजण्याच्या सुमारास छापा मारला कोट्यवधी रुपयांची उलाढाल, परदेशी कनेक्शन असण्याची शक्यता वर्तवण्यात येत असल्यामुळे एकच खळबळ उडाली

---------------

## महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी

करण्यात आली. तर न्यायालयात कर्नाटकाने फेरविचार याचिका दाखल करत पुन्हा वेळकाढूपणा केला आहे.२०१७ मध्ये शेवटची सुनावणी झाली होती. त्यावेळी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विधिज्ज्ञ ॲड. हरिष साळवे यांनी महाराष्ट्राची बाजू मांडली होती. आगामी सुनावणीलाही त्यांची नियुक्ती करावी, यासाठी मध्यवर्ती समितीतर्फे प्रयत्न करण्यात येत आहेत. उच्चाधिकार समितीची बैठक व्हावी, यासाठीही पत्रकार व्यवहार करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दोन वेळा बैठक घेण्यात आली. तज्ज्ञ समितीचे अध्यक्ष खासदार धैर्यशील माने यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठविले. पण ही बैठक झाली नाही. दरम्यानच्या काळात वरिष्ठ वकिलांशी समिती नेत्यांची ऑनलाईन संवाद झाला आहे. आता आठ वर्षांनंतर पुन्हा सुनावणी होणार आहे. त्यामुळे सीमावासीयांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

----------

## अडीच वर्षासाठी

शिवसेनेचे माजी खासदार राहुल शेवाळे, खासदार श्रीकांत शिंदे, श्रीरंग बारणे यांची भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम आणि आशिष शेलार यांच्यासोबत बैठक होणार आहे. महापौर पद, स्थायी समिती तसेच सुधार समिती, आरोग्य आणि शिक्षण समितीच्या वाटाघाटीवरही चर्चा होणार असल्याची माहिती आहे. मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपने १३७ जागांवर तर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने ९० जागांवर निवडणूक लढली. या निवडणुकीत भाजपला तब्बल ८९ जागांवर यश आलं. तर शिंदेंना ९० पैकी केवळ २९ जागांवर यश मिळालं. असं असलं तरी एकनाथ शिंदे यांच्या पक्षाकडून महापौर पदावर दावा केला जात असल्याची चर्चा आहे. एकनाथ शिंदे यांच्या या भूमिकेची राज्यातील भाजप नेत्यांनी पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाकडे तक्रार केल्याचं वृत्त एका वृत्त वाहिनीने सूत्रांच्या हवाल्याने दिलं आहे.भाजपला महापौर पदासाठी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची मदतीची आवश्यकता आहे. यामुळे एकनाथ शिंदे यांच्याकडून दबावतंत्राचा वापर करुन अडीच वर्षे महापौर पदाची मागणी करण्यात आल्याची चर्चा आहे. तसेच शिंदेंनी भाजपकडे स्थायी बेस्ट समितीत योग्य वाटा मागितल्याच्या देखील चर्चा आहेत. असं असलं तरी भाजपच्या दिल्लीतील नेतृत्वाने भाजपचाच महापौर होईल, असं मित्रपक्षांना सांगण्याची सूचना राज्यातील भाजप नेत्यांना दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर आता दोन्ही पक्षांच्या नेत्यांची दिल्लीत बैठक पार पडणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

---------

## काका पुतण्याच्या राष्ट्रवादीचे अंडरस्टँडिंग

राज्यातील इतर जिल्ह्यांमधे देखील घड्याळ आणि तुतारी वाजविणारा माणूस अशा दोन्ही चिन्हांवर राष्ट्रवादीचे उमेदवार निवडणूक लढणार आहेत.म्हणजेच दोन्ही राष्ट्रवादी एकत्रच निवडणुकीला सामोरे जाणार आहेत. एकीकडे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमधील चिन्हाची लढाई सर्वोच्च न्यायालयात निर्णायक टप्प्यावर पोहोचलेली असताना दुसरीकडे दोन पक्षांमधील अंडरस्टँडिंग देखील निर्णायक टप्प्यावर पोहोचल्याचं चित्र आहे. त्यामुळं न्यायलयाचा निकाल कुणाच्याही बाजूने लागो, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसनी महापालिकेप्रमाणे जिल्हा परिषदांच्या निवडणुका देखील एकोप्याने लढवण्याचा निर्णय घेतलाय. जिथे जे चिन्ह फायद्याचं ठरेल तिथं ते चिन्ह वापरण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार घड्याळ या एकाच चिन्हावर लढणार आहेत आणि या उमेदवारांची जबाबदारी तुतारीच्या चिन्हावर खासदार म्हणून निवडून आलेल्या डॉ. अमोल कोल्हेंवर असणार आहे. जुन्नर तालुक्यात एकनाथ शिंदेंच्या शिवसेनचं आव्हान असल्याने हा निर्णय घेण्यात आलाय. महापालिका निवडणुकीवेळी देखील दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी समन्व्य राखत उमेदवार दिले होते. पुणे महापालिकेचा जो भाग सुप्रिया सुळेंच्या बारामती लोकसभा मतदारसंघात येतो आणि जो भाग अमोल कोल्हेंच्या शिरूर लोकसभा मतदारसंघात येतो त्या भांगामध्ये तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हांवर उमेदवार उभे करून त्यांना निवडणून आणण्यात आले. एका अर्थाने तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हाचे अस्तित्व कायम राहील याची खबरदारी घेण्यात आली.अजित पवारांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे मात्र दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्र येण्याबद्दल वेगळा सूर आळवत असल्याचं बोललं जातंय. जिल्हा परिषदेच्या निवडणुका पार पडल्या की महाराष्ट्रात २०२९ पर्यंत कोणत्याच महत्त्वाच्या निवडणुका होणार नाहीत. अशावेळी एकीकडे अजित पवार सत्तेत राहून सत्तेचे फायदे घेण्याचा प्रयत्न करताना दिसतील, तर दुसरीकडे रोहित पवार आणि इतर नेते विरोधच राजकारणही करू शकतील. त्यामुळं दोन पक्षांचं स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवणं पवारांच्या राजकारणासाठी फायद्याचं ठरू शकतं.

------------------

## गोविंद पानसरे हत्या

प्रकरणात अटक करण्यात आली होती. विशेष तपास पथकाने त्यांच्यावर दोषारोपपत्र दाखल केले. कोल्हापूरच्या सत्र न्यायालयाने त्यांना सशर्त जामीन मंजूर केला आहे.समीर गायकवाड याच्या मोबाईल फोनमधील डेटा आणि आवाजाच्या नमुन्यांची पडताळणी करण्यात आली आहे, असे तपास यंत्रणांनी न्यायालयाला सांगितले आहे. जानेवारी २०२४ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने जामिनाच्या अटींचे उल्लंघन केले नाही असे सांगत, जामीन रद्द करण्याची राज्य सरकारची याचिका फेटाळली होती.१६ फेब्रुवारी २०१५ रोजी कोल्हापूरमध्ये कॉ. गोविंद पानसरे यांच्यावर हल्ला झाला होता. २० फेब्रुवारी २०१५ रोजी पानसरे यांचा उपचारावेळी मृत्यू झाला. या प्रकरणात एकूण १२ आरोपींची नावे समोर आली होती. त्यापैकी १० जणांना अटक करण्यात आली आहे, तर २ आरोपी फरार आहेत. या हत्येचा संबंध तर्कवादी नरेंद्र दाभोलकर आणि एम. एम. कलबुर्गी यांच्या हत्यांशी जोडला जात आहे. या प्रकरणात समीर गायकवाड यालाही अटक करण्यात आली होती.

-----------

## राज्यात १५ लाख नोकऱ्या उपलब्ध होणार

भविष्याचे पॉवर हाऊस असल्याचे देखील मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या दावोस दौ-याच्या पहिल्याच दिवशी १४ लाख ५० हजार कोटी गुंतवणुकींचे १९ सामंजस्य करार झाले. यावेळी गुंतवणुकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांचे प्रतिनिधीमंडळ दावोस येथे गेले आहेत. दावोस दौ-याच्या पहिल्याच दिवसापासून जगभरातील विविध क्षेत्रांतील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दाखवण्यास सुरुवात केली. यातून गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरू झाला आहे. या दौ-यावेळी दावोसमधील महाराष्ट्र पॅव्हेलियनचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले.तब्बल १४ लाख ५० हजार कोटींचा गुंतवणूक करार करण्यात आला. या गुंतवणुकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून यावेळी विविध विभागांनी आणि विविध क्षेत्रातील उद्योगांच्या प्रतिनिधींसमवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्ष-या करण्यात आल्या. या उद्घाटन कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, 'भविष्याचा वेध घेण्यासाठी सज्ज, विश्वासार्ह आणि दीर्घकाळचा भागीदार म्हणून महाराष्ट्र स्वागत करीत आहे. भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस म्हणून महाराष्ट्र जगाला, उद्योग विश्वाला साद घालत आहे. महाराष्ट्रावरील उद्योग क्षेत्राचा, गुंतवणूकदारांचा हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आम्ही सदैव सज्ज आहोत. येथे होणा-या करारांवरील पुढील कार्यवाहीबाबत वॉर रूमच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येईल. उद्योजकांना आवश्यक सुविधा वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने मिळाव्यात याची काळजी घेतली जाईल. तसेच, 'उद्योजक-गुंतवणूकदारांकडून मिळत असलेला प्रतिसाद पाहता, यंदा गतवर्षीहून अधिक गुंतवणूक आणि रोजगार संधीचे सामंजस्य करार होतील असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. विशेषत: मुंबईतील घन कचरा व्यवस्थापन, हवा आणि पाणी गुण संनियंत्रणाच्या माध्यमातून सर्क्युलर इकॉनॉमीची संरचना उभी केली जात आहे. तसेच महाराष्ट्र हे अमर्याद संधीचे राज्य आहे. त्याबाबत आणि एमएमआर क्षेत्राच्या विकासासह, तिस-या मुंबईच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार समितीने आराखडा निश्चित करून दिला आहे. या माध्यमातून व्यवसायाच्या आणि चांगल्या पगाराच्या रोजगार निमितीवर भर दिला जात आहे', असे मुख्यमंत्री म्हणाले. हरित ऊर्जा, अन्न प्रक्रिया, पोलाद निर्मिती, आयटी-आयटीईएस, डाटा सेंटर्ससह ईव्ही- ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डीजिटल इन्फ्रा अशा विविध क्षेत्रातील ही गुंतवणूक मुंबईसह राज्याच्या रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये पोहोचणार आहे. त्यामुळे या सर्व ठिकाणी उद्योगवाढीसह मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मितीला चालना मिळणार आहे.

--------------

## तमिळनाडूत राष्ट्रगीतावरून ड्रामा

अध्यक्षांनी फेटाळून लावल्याने हा पेच निर्माण झाला आहे. विधानसभेच्या सत्राची सुरुवात परंपरेनुसार तामिळ गीताने झाली. मात्र, राज्यपालांनी आग्रही मागणी केली की तामिळ गीतासोबतच राष्ट्रगीतही वाजवले गेले पाहिजे. या मागणीवरून विधानसभा अध्यक्ष अप्पावू आणि राज्यपाल यांच्यात शाब्दिक चकमक उडाली. अध्यक्षांनी ही मागणी मान्य करण्यास नकार दिल्यानंतर, संतापलेल्या राज्यपालांनी अभिभाषण न करताच सभागृहातून काढता पाय घेतला.सभागृहाबाहेर पडल्यानंतर राज्यपालांनी आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली. राष्ट्रगीताला योग्य सन्मान दिला जात नाही, याचे मला प्रचंड दु:ख वाटते. माझ्या अभिभाषणात वारंवार अडथळे आणले गेले. मला माझ्या जबाबदारीची पूर्ण जाणीव आहे, पण राष्ट्रगीताचा सन्मान हा सर्वतोपरी असायला हवा असे आर. एन. रवी यांनी म्हटले आहे. इतकेच नव्हे तर, बोलताना माझा माईक बंद करून माझा अपमान करण्यात आला असा गंभीर आरोपही त्यांनी केला आहे.

----------

## संभाजीनगरमध्ये

चिथावत होते . आरोपी शुभम जाट सह इतरांच्या हातात गावठी कट्टा आणि तलवारी चाकू अशी हत्यार होती. दार न उघडल्याने बाहेर जमलेल्या गँगने दगडफेक करायला सुरुवात केली. आरोपी शुभम जाटने भीतीपोटी गच्चीवर जाणाऱ्याच्या दिशेने गोळी झाडली. गोळीबाराचा आवाज ऐकून परिसरातील नागरिक जमा झाले. थोडक्याने मध्ये पडणाऱ्या सगळ्यांना ठार मारण्याचा धमक्या दिल्या. जमाव वाढतोय हे लक्षात येताच आरोपींनी पलायन केलं. मोबाईल चोरीच्या एका वादातून हा हल्ला झाल्याची माहिती पोलीस तपासातून समोर येत आहे. या घटनेनंतर परिसरात घबराट पसरली होती. घटनेनंतर पुंडलिकनगरचे पोलीस निरीक्षक अशोक भंडारे, उपनिरीक्षक अर्जुन राऊत, सुनील म्हस्के, अंमलदार प्रकाश डोंगरे, शिवाजी शिंदे, संदीप बीडकर, अजय कांबळे, मुकुंदवाडीचे उपनिरीक्षक शिवाजी घोरपडे, नरसिंग पवार आदिनी बीड बायपासवरील म्हस्के पेट्रोल पंपामागे शुभमचे घर गाठले. तेथे हल्लेखोर असल्याने पथकाने घराला घेराव घातला, काही हल्लेखोरांनी गच्चीवरून उडी मारून पळण्याचा प्रयत्न केला. त्यात पोलिसांनी मयूर संजय उनगे, शिवा रमेश भालेराव, गोल्या उर्फ विजय दिनकर धनई, मनोज संजय पडूळ, सागर राऊत, अमर उर्फ अतुल पवार यांना पकडले.

-------------

## नदी पुनरुज्जीवनासाठी महाराष्ट्राचे

स्वप्न सत्यात उतरू शकेल असे सांगितले. या प्रक्रियेमुळे भविष्यात नद्यांचे पावित्र्य आणि त्यांची नैसर्गिक प्राकृतिकता टिकवून ठेवण्यात देशाला मोठे यश मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. या प्रस्तावावर केंद्रीय मंत्री सी. आर. पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक मार्गदर्शन केले.तसेच महाराष्ट्राने याबाबत घेतलेल्या पुढाकारबद्दल विशेष कौतुक केले आणि यासाठी सर्वोतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. या बैठकीस राष्ट्रीय नदी संरक्षण संचलनालयाचे () संचालक राजेश कुमार, महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण विभागाच्या सचिव श्रीमती जयश्री भोज यांसह केंद्र व राज्यातील इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. २१ जानेवारी २०२६


## थोडक्यात



माजलगाव:– महाराष्ट्र केसरी बीड जिल्हा निवड चाचणी कुस्ती स्पर्धेत ७० किलो वजनी गट गादी विभागात माजलगांवचा पैलवान सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर यांनी सुवर्णपदकाची कमाई करून पुढील होणाऱ्या महाराष्ट्र केसरी राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी पात्र ठरला यावेळी डॉ.ओमप्रकाश शेटे (अध्यक्ष आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र राज्य) भिमराव धोंडे (माजी आमदार आष्टी), पैलवान सईद चाऊस (महाराष्ट्र केसरी),पैलवान शंकर आण्णा कराड (उपाध्यक्ष:– बीड जिल्हा कुस्तीगीर संघ) या मान्यवरांच्या हस्ते गोल्ड मेडल, प्रमाणपत्र, व मानधन देवून पैलवान सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर यांना गौरविण्यात आले.

### वि.हिं.प.च्या अध्यक्षपदी डॉ. गोपाळ चौसाळकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी



विश्व हिंदू परिषद प्रांत कार्यकारीणीची बैठक नुकतीच छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाली. त्यात नवीन अंबाजोगाई जिल्हा विश्व हिंदू परिषद यास मान्यता देण्यात येवुन नूतन अंबाजोगाई जिल्हा विश्व हिंदू परिषदेच्या अध्यक्षपदी जबाबदारी डॉ गोपाळ चौसाळकर यांची निवड करण्यात आली तर अंबाजोगाई जिल्हा विश्व हिंदू परिषदेच्या मंत्री (कार्यवाह)पदाचे दायित्व माजलगाव येथील एड. बाळकृष्ण तेरकर यांच्याकडे तर जिल्हा सहमंत्रीपदी परळी (वै.) येथील उद्योजक व कार्यकर्ते शैलेश पांडे यांना निवडण्यात आले आहे. नवीन अंबाजोगाई जिल्हा कार्यकारणी व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

### संभाजी नवसुपे गुरुजी यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी



आष्टी येथील जुन्या पिढीतील शिक्षक संभाजी सुडाजी नवसुपे यांचे दि.१९ जानेवारी २०२६ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.ते ९२ वर्षाचे होते.जि.प. शाळा आष्टा, डोंगरगण,धानोरा,शेरी, अंबाजोगाई,मुलांची शाळा आष्टी येथे त्यांनी सेवा केली.आष्टी बसस्थानका जवळील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी डॉ.मधुकरराव हंबर्डे,मेहेर ज्वेलर्स, जीया बेग,सरपंच मुळे,पी.वाय.काळे गुरुजी,प्रा.सय्यद अल्लाउद्दीन,लक्ष्मण रेडेकर, सचिन रानडे,पंचक्रोशीतील अनेक मान्यवर, शिक्षक आणि व्यापारी वर्ग,त्यांचे विद्यार्थी,चाहते,स्नेही,आप्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या मागे पत्नी,मुलगा,सून,नातू आदी परिवार आहे.



### नवरात्री उत्सवाच्या देखाव्याने हळदी–कुंकू संपन्न

बीड । प्रतिनिधी

माऊली चौक पेठ बीड येथील माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने खंडेश्वरी देवी नवरात्र उत्सव व जत्रा या देखाव्याने हळदीकुंकू चा कार्यक्रम थाटामाटात संपन्न झाला

यात अनेक महिलांनी हजेरी तर लावलीच त्याचबरोबर खंडेश्वरी देवी संस्थानाचे ट्रस्टी श्री राणा दादा चव्हाण यांनी संपत्नीक सौ राखी चव्हाण यांच्यासह नगरसेविका श्रीमती मीनाताई रणजीत सिंह चव्हाण यांनीही भेट दिली आणि तुम्ही महिलांनी साक्षात खंडेश्वरी देवीचे दुसरे हुबेहूब रूप साकार केले आहे असे म्हणून महिला मंडळाचे तोंड भरून कौतुक केले या देखाव्यात खंडेश्वरी माता मंदिर सह काळोबा घीर धनगर समाधी व जत्रेतील राज पाळणा, मौत का कुवा, पन्नालाल गधा, विविध गाड्यांचे खेळ तसेच विकण्याचे व खाण्याचे स्टॉल हुबेहूब तयार करून रावण दहन ही दाखवले होते

# सरकारी बाबूंना दंड, मात्र कंत्राटदारांना पायघड्या!

## वडवणी–तेलगाव २५५ कोटींच्या शक्तीपीठ महामार्गावर काम सुरू असतानाच तडे



बीड । प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत १९ जानेवारीपासून जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दुचाकी चालविताना हेल्मेट वापरणे अनिवार्य करण्यात आले आहे. पहिल्याच दिवशी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १८० शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येऊन त्यांच्याकडून एकूण १ लाख ८० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

एकीकडे जिल्हा प्रशासन व रस्ता सुरक्षा समिती नियम मोडणाऱ्या सरकारी बाबूंवर तत्परतेने दंडात्मक कारवाई करत असताना, दुसरीकडे मात्र कोट्यवधींचे रस्ते काम निकृष्ट दर्जाचे असतानाही संबंधित कंत्राटदार व अभियंत्यांवर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे

बीड–परळी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ एफ (शक्तीपीठ महामार्ग) अंतर्गत जरूड–शिरसाळा या सुमारे ५५ किलोमीटर अंतरावरील अंदाजे २५५ कोटी रुपये खर्चाच्या सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. मात्र, काम सुरू असतानाच रस्त्यावर मोठमोठ्या भेगा पडू लागल्याने या कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

काम पूर्ण होण्यापूर्वीच तडे पडणे म्हणजे निकृष्ट दर्जाचे साहित्य व चुकीच्या तांत्रिक प्रक्रियेचा स्पष्ट पुरावा असल्याचा आरोप करण्यात येत आहे. असे असतानाही राष्ट्रीय महामार्ग विभागाचे उपविभागीय अभियंता राजेंद्र भोपळे हे संबंधित कंत्राटदार एम. के. शिवहरे कन्स्ट्रक्शन यांची सातत्याने पाठराखण करत असल्याचा आरोप डॉ. ढवळे यांनी केला आहे.

### सखोल चौकशी व कठोर कारवाईची मागणी

या संपूर्ण प्रकरणाची गुणनियंत्रक विभागामार्फत तातडीने सखोल चौकशी करून, कामाच्या दर्जात तडजोड करणाऱ्या कंत्राटदारावरतसेच जबाबदारी टाळणाऱ्या संबंधित अभियंत्यावर प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अशी लेखी तक्रार उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा. अजितदादा पवार यांच्याकडे करण्यात आल्याचे डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले.

## मांजरसुंबा येथे महिला अखंड सप्ताहास प्रारंभ

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथे वर्ष वै.यमुनाताई शिंदे यांनी तुलसी अर्चना नामजप अखंड हरिनाम सप्ताहाचे १९ वे वर्ष असुन ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या हस्ते सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असुन दैनंदिन पहाटे ४ ते ६ काकडा भजन,८ ते १० तुलसी अर्चना नामजप,१० ते ११ गाथा भजन,दु.१ ते ५ भागवत कथा ,सां.५ ते ६ हरिपाठ,रात्री ८ ते १० हरि किर्तन तर रोज दु.१ ते ५ वेळेत कथा प्रवक्त्या ह.भ.प.प्रतिक्षाताई करडुले(थोरवे) यांची श्रीमद भागवत कथा राहिल अशी कार्यक्रमाची रूपरेषा ठरलेली आहे.दि.२१ जानेवारी बुधवार रोजी किर्तनकार ह.भ.प.शारदाताई गालफाडे, दि.२२ गुरुवारी रोजी ह.भ.प.रामायनाचार्य सिताताई आव्हाड, दि.२३ शुक्रवारी रोजी ह.भ.प.भागवताचार्य वर्षाताई काळे, दि.२४ शनिवारी रोजी ह.भ.प.प्रतिभाताई गायकवाड, दि.२५ रविवारी रोजी ह.भ.प.उषाताई उम्रजकर यांच्या रात्री ८ ते १० अमृततुल्य किर्तन आयोजन ठरले आहे.तर सांगता दि.२६ सोमवारी ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे मठाधिपती बंकटस्वामी संस्थान नेकनुर यांचे सकाळी ११ ते १ काल्याचे किर्तन होईल व मांजरसुंबा ग्रामस्थातर्फे महाप्रसादाचे आयोजन महिला संस्कार आश्रम नेकनुर रोड मांजरसुंबा येथे करण्यात आले आहे.तरी बीड जिल्ह्यातील तालुक्यातील जास्तीत जास्त महिला व भाविक भक्तांनी या अमृततुल्य कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन मांजरसुंबा येथिल तरुण मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे.

## शहीद दिनानिमित्त आयएमए बीड व वुमन विंगकडून सेवाभावी उपक्रम




बीड । प्रतिनिधी

गुरु तेग बहादूर जी यांच्या ३५० व्या शहीद दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी उपस्थित नागरिक व भाविकांसाठी आयएमए बीड व आयएमए वुमन विंग यांच्या वतीने ५००० बिस्किटांचे पुडे वितरित करण्यासाठी मा. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके यांच्याकडे पुढे नांदेड पाठवणाकरता सुपूर्त करण्यात आले.

या सेवाभावी उपक्रमाचे काम आयएमए बीडचे अध्यक्ष डॉ. अनंत मुळे, सचिव डॉ. अमोल गिते तसेच वुमन विंगच्या डॉ. सुनीता बारकुल व डॉ. जयश्री घुगे यांनी केले. समाजातील सर्व घटकांपर्यंत सेवा पोहोचावी या उद्देशाने आयएमए बीड व आयएमए वुमन विंग सातत्याने सामाजिक उपक्रम राबवत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.हा उपक्रम उपस्थित नागरिक व भाविकांकडून विशेष कौतुकास पात्र ठरला.

## वै. किसनबाबांच्या पवित्र वास्तव्याने पावन झालेल्या गोरक्षनाथ गडावर लाखो भाविकांची उपस्थिती –मा.मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

येथून जवळच असलेल्या श्रीक्षेत्र गोरक्षनाथगडावर धर्मनाथ बीज निमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता ह भ प अक्रूर महाराज साखरे यांच्या अमृततुल्य काल्याच्या कीर्तन प्रसंगी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर उपस्थित होते ते म्हणाले की,वै किसन बाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या गोरक्षनाथगडावर लाखोंच्या संख्येने भाविकांची उपस्थिती दिसू लागली आहे

आज वै ह भ प किसन बाबा महाराज यांच्या आशीर्वादाने व मठाधिपती नवनाथ बाबा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह श्री क्षेत्र गोरक्षनाथगडावर येथे आयोजित करण्यात आला होता आज ह भ प अक्रूर महाराज साखरे यांचे काल्याचे किर्तन होते याप्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर,ह भ प अखंडानंद गिरी महाराज, माजी आमदार बदामराव पंडित,मराठा समाजाचे नेते मनोजदादा जरांगे पाटील, डॉ योगेश क्षीरसागर अरुण डाके जगदीश काळे, विलास बडगे,गणपत डोईफोडे, ॲड राजेंद्र राऊत,सखाराम मस्के,शिवाजीराव फड,ॲड विष्णूपंत काळे,हरिदास जोगदंड,गोरख दंने,नारायण माने,अरुण लांडे,संदीप डावकर बालाप्रसाद जाजू,तुषार घुमरे,राजाभाऊ घुमरे,भाऊ सुरवसे,उद्धव म्हेत्रे,नारायण देवकते,ओमप्रकाश खवतड, बंडू नाना घुमरे,भगीरथ बांडे,नवनाथ घोडके,बंडू लांडे,राम भोगे, नागेश शिंदे



आदी उपस्थित होते,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गंगाभाऊ घुमरे यांनी केले,यावेळी बोलताना माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, धर्मनाथ बीजेला यावर्षी ७५ वर्षे पूर्ण होत असून याची सुरुवात वैकुंठवासी किसन बाबा यांनी केलेली आहे त्यानिमित्त गोरक्षनाथ गडावर प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मोठ्या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे म्हणून वैकुंठवासी किसन बाबा यांचे नाव घेतले जाते त्यांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झाली असून ह भ प शांती ब्रह्म नवनाथ बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली या तीर्थक्षेत्राची महती आणि महत्त्व वाढू लागले आहे पवित्र ती भूमी पावन तो देश तेथे हरीचे दास जन्म घेती याप्रमाणे या पुण्यभूमीत वैकुंठवासी किसन बाबा आणि नवनाथ बाबा यांच्या पुण्याईने दिवसेंदिवस या ठिकाणचे महत्त्व आणि महात्म्य वाढू लागले असून लाखो भाविकांची उपस्थिती हेच एक उदाहरण आहे जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून इथे लाखो भाविक येऊ लागले आहेत मनोभावे सेवा करणाऱ्या भक्ताला गोरक्षनाथाचा आशीर्वाद मिळतो जात–पात बाजूला काढून वारकरी सांप्रदायाने हा समाज एकत्र ठेवण्याचा प्रयत्न केला असून महाराष्ट्राची संस्कृती जतन करण्याचे काम प्रत्येकाने करायला हवे गोरक्षनाथ टेकडीचा विकास सर्वांच्या सहकार्याने झाला असून यामध्ये आपण खारीचा वाटा उचलल्याचे समाधान होत आहे,यावेळी ह भ प अक्रूर महाराज यांनीही माजीमंत्री क्षीरसागर यांनी गोरक्षनाथगडावर केलेल्या योगदानाचा उल्लेख करत धार्मिक क्षेत्रात जयदत्त अण्णांवर प्रेम करणारी मंडळी खूप आहे,कारण बीड जिल्ह्यातील अनेक धार्मिक क्षेत्राला त्यांचे सहकार्य असते असे ते म्हणाले.

## पान ६ वरुन...

### नवनाथ ग्रंथातील गर्भगिरी पर्वत

सप्ताह मध्ये हरी किर्तन, प्रवचन, भावार्थ रामायण, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ, विष्णु सहस्त्रनाम, संगीत भजन हरी जागर असे कार्यक्रम सप्ताह मध्ये झाले

गुरु गोरक्षनाथ महाराज, साधू बाबा, किसान बाबा यांची झोपडी आज ही आहे तशी गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी जतन करून ठेवली आहे आहे

गोरक्षनाथ टेकडीवर ऊर्जा केंद्र

गुरु गोरक्षनाथ महाराज मंदिर

* गुरु किसन बाबा व साधू बाबा महाराज समाधी

तुळजाभवानी माता मंदिर

दत्ता गुरु यांचे अत्यंत देखणी मूर्ती व मंदिर

* गुरुवर्य वैकुंठवासी किसान बाबा साधू बाबा महाराज यांच्या सानिध्यातून कडूलिंब हे त्याची आज हि पान गोड लागतात

### फार्मर आयडीतील चुकीच्या

आली आहे. अन्यथा शेतकऱ्यांसह भारतीय जनता पार्टी व युवा मोर्चा वडवणी तालुका यांच्या वतीने तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे,अंकुश वारे,राम सावंत, श्रीमंत मुंडे,बाबुराव तवरे,अंगद बडे,नवनाथ तुरे,भाऊसाहेब तांबडे,आसाराम मात्रे,सदाशिव नखाते, विश्वनाथ बडे,प्रताप मात्रे,सुरेश दोडताले, बाबा गिलबिले,विश्वनाथ गिलबिले,अर्जुन बडे, हरीराम बडे, विष्णू मात्रे,गोरख मात्रे, संतराम हजारे,शेख सादिक,देवानंद तांबडे, बाबूराव कोठुळे,नामदेव डोंगरे,अर्जुन पोटे यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महाराष्ट्र राज्य जिल्हा आरोग्य

देण्यासाठी त्यांची निवड सार्थ ठरणार आहे. शेकडे यांचे निवडीची घोषणा होतात जिल्ह्यात सर्व स्तरातून आनंद व्यक्त करण्यात येत असून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या निवडीनंतर बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी रौफ, विभागीय अध्यक्ष बागलाने, जिल्हा कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष कालिदास सानप यांच्यासह अधिकारी कर्मचाऱ्यांनी यांनी त्याचा सत्कार केला. डॉ. शेकडे यांच्या नियुक्तीमुळे आरोग्य अधिकारी संघटना अधिक बळकट आणि सक्षम होईल अशी अपेक्षा सर्व स्तरातून व्यक्त करण्यात आली आहे.

### ग्रामीण रुग्णालय पाटोदा

तांदळे आणि जिल्हा पर्यवेक्षक रमेश तांगडे यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून कामकाजाचा आढावा घेतला व टीमला प्रोत्साहित केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी पाटोदा येथील आरबीएसके (ठइडघ) पथकातील सर्व अधिकारी व कर्मचारी, तसेच ग्रामीण रुग्णालयातील परिचारिका आणि कक्षसेवकांनी मोलाचे सहकार्य व अथक परिश्रम घेतले. ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात आलेल्या या आरोग्यदायी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### पाण्याची वितरण व्यवस्था

बाबत देखील त्यांनी यावेळी सूचना दिल्या. परळी शहरात अनेक ठिकाणी वॉल बसवणे,दरमहा पाण्याची तपासणी करणे तसेच स्वतः नगर परिषदेने तज्ञ डॉक्टरची पाणी तपासणी अधिकारी म्हणून नेमणूक करून पाण्याचे सॅम्पल टेस्ट करणे,सर्व पाण्याच्या टाक्या स्वच्छ करणे वॉल गळती दूर करणे,याबाबत नगराध्यक्षांनी फक्त सूचना दिल्या. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे व माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली लवकरच परळी शहराच्या वाढत्या नागरिक क्षेत्रासाठी वाढीव पाणीपुरवठा योजनेचा विकास आराखडा केला जात असून ही परळी नगरीसाठी महत्वाची उपयुक्त योजना ठरेल त्या दृष्टीने प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी सांगितले. या आढावा बैठकीला नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्या समवेत माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव भैय्या धर्माधिकारी, नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### गणेश जयंती निमित्त

सादर केला त्यास शैलेश गोस्वामी, डॉ.प्रज्वल देशपांडे (मुकद्दम) यांनी अनुमोदन दिले यावेळी गजानन देशपांडे, प्रज्वल गोविंदराव देशपांडे,सागर दीक्षित,अक्षय देशपांडे,अशिष जोशी, सुमित केजकर,मनोज जोशी,अक्षय मोहरीर रावु व वेध पुराणिक स्वप्निल स्वामी गणेश व्यवहारे,आनंद देशपांडे आदीसह महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गहिनीनाथ महाराज समाधीचे

दुर्लक्ष कायम

या मूळ स्थानाच्या विकासासाठी अनेक वेळा मागण्या करूनही स्थानिक ठोस पावले उचललेली नाहीत, असा आरोप भाविकांकडून होत आहे. शासनाकडून गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांच्या निधीच्या घोषणा केल्या जातात, मात्र हा निधी मूळ समाधीपर्यंत पोहोचत नसल्याचे वास्तव आहे.

भाविकांची ठाम मागणी

लोकप्रतिनिधींनी इच्छाशक्ती दाखवून या मूळ समाधी स्थानाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र आराखडा तयार करावा. रस्ते, पाणी, भक्तनिवास, स्वच्छता व इतर मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात. हे स्थान केवळ धार्मिकच नव्हे तर पर्यटनाच्या दृष्टीनेही विकसित होऊ शकते, अशी ठाम मागणी भाविकांकडून करण्यात येत आहे.

## जिल्हा परिषद प्रा.शाळा मोगरा येथे आनंदनगरी उपक्रमाचे यशस्वी आयोजन



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील जि.प.प्रा. शाळा मोगरा शाळेत आनंदनगरी या अभिनव उपक्रमाचे प्रभावी व नियोजनबद्ध आयोजन करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून शाळेने पारंपरिक शिक्षणाबरोबरच उद्योजकता, व्यवहारज्ञान व कौशल्याधिष्ठित शिक्षण यांचे प्रत्यक्ष अनुभवाधारित धडे विद्यार्थ्यांना दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच गिण्यान देव राठोड हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख, के.प्रा. शा. मरी – विठ्ठल आरबे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मच्छिंद्र इंगळे व माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष सिराज काझी यांनी उपस्थिती दर्शवली.यावेळी ग्रामपंचायत सदस्य संदीप सावंत, माणिक राठोड, भारत घनघाव, सुभाष शिंदे, श्रीकृष्णा शिंदे, विक्रम शिंदे, अमजद तांबोळी, विकास झेटे, गुंडाभाऊ शिंदे, रमेश तळेकर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक सुभाष घनघाव यांच्या नेतृत्वाखाली बालाप्रसाद चव्हाण,हानुमंत पाढंरपोटे,सोनवळे सर, गायके मॅडम, आबुज मॅडम व शिंगारे सर यांनी प्रभावी टीमवर्कद्वारे मोलाचे सहकार्य केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चव्हाण सर तर प्रस्ताविक: घनघाव सर, मार्गदर्शन: विठ्ठल आरबे सर यानी केले.या उपक्रमास आर्थिक व भौतिक पाठबळ देताना सरपंचांनी ५,०००/– पाच हजार रोख देणगी दिली, तर उपसरपंचांनी प्रोजेक्टर व संगणक उपलब्ध करून देण्याचे सहकार्य जाहीर केले. ही बाब शाळेच्या डिजिटल व शैक्षणिक क्षमतावाढीसाठी महत्त्वपूर्ण ठरली. आनंदनगरी अंतर्गत विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स उभारून उत्पादन, विक्री, किंमतनिर्धारण व ग्राहक संवाद यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. पालकांनी स्टॉल्समधून खरेदी करून पदार्थांचा आस्वाद घेत विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेला प्रोत्साहन दिले.एकूणच हा उपक्रम विद्यार्थी–केंद्रित, कौशल्यविकासाभिमुख आणि समाजसहभागातून शाळेचा सर्वांगीण विकास साधणारा ठरला.

## सादरीकरण स्पर्धेत कवी हरीष हातवटे राज्यातून प्रथम

**आष्टी । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्वरचित काव्य सादरीकरण स्पर्धेत बीड जिल्ह्याचे सुपुत्र, प्रसिद्ध कवी व शिक्षक हरीष हातवटे यांनी राज्यातून प्रथम क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे.**



परिषदेमार्फत राज्यभरात तब्बल ४५ प्रकारच्या विविध सांस्कृतिक, साहित्यिक व बौद्धिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या दोन महिन्यांपासून या स्पर्धा महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये पार पडत होत्या.

या स्पर्धांची सुरुवात केंद्रस्तर, तालुकास्तर व विभागस्तर अशा टप्प्यांतून झाली. महाराष्ट्रातील आठही विभागांतील विभागस्तरीय स्पर्धा पूर्ण झाल्यानंतर प्रत्येकी पाच अशा एकूण ४० स्पर्धकांची निवड राज्यस्तरीय फेरीसाठी करण्यात आली होती.

संगमनेर येथे राज्यस्तरीय अंतिम फेरी

राज्यस्तरीय स्वरचित काव्य सादरीकरण स्पर्धा दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी संगमनेर महाविद्यालय (जि. अहमदनगर) येथे अत्यंत उत्साहात पार पडली. या स्पर्धेत राज्यातील विविध विभागांतून निवड झालेल्या कवींमधून परीक्षण समितीने गुणांकनाच्या आधारे राज्यातील अंतिम दहा कवींची निवड केली.

या अंतिम यादीत

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाळुंज केंद्र – जामगाव, तालुका आष्टी, जिल्हा बीड येथील पदवीधर शिक्षक तथा महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी हरीष हातवटे यांच्या 'गाव' या कवितेने अव्वल स्थान पटकावले.

त्यांच्या कवितेमध्ये ग्रामीण जीवनाचे वास्तव, मातीशी नाते, संवेदना व समाजभान यांचे प्रभावी चित्रण असल्याने परीक्षण समितीने विशेष दखल घेतली. या स्पर्धेत परळी येथील प्रसिद्ध गझलकार दिवाकर जोशी सर यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. या दोन्ही कवींनी आपल्या साहित्यिक प्रतिभेच्या जोरावर बीड जिल्ह्याचे नाव राज्यभर उज्वल केले. आष्टी तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव राज्यस्तरीय यशाबद्दल कवी हरीष हातवटे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# हिरव्या चाऱ्याच्या वाढत्या दराने शेतकरी अडचणीत

## दुग्ध व्यवसाय सुरू ठेवणे दिवसेंदिवस अवघड

पुणे / प्रतिनिधी

शेतकरी आणि पशुपालक सध्या मोठ्या आर्थिक तणावाखाली आहेत. पशुखाद्य आणि हिरवा चाऱ्याचे दर गेल्या काही महिन्यांत प्रचंड वाढले आहेत. यामुळे शेती करणे आणि दुग्ध व्यवसाय सुरू ठेवणे दिवसेंदिवस अवघड होत चालले आहे. विशेषत: अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह पूर्णपणे दूध व्यवसायावर अवलंबून असल्याने ही परिस्थिती गंभीर ठरली आहे.

हिरव्या चाऱ्याचे दर कसे आहेत? : सध्या वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे दर असले तरी सरासरी मका आणि उसाचा हिरवा चारा प्रति टन ५,००० ते ५,५०० रुपयांच्या दराने उपलब्ध आहे. याशिवाय, पूर्वी ५० किलो सरकी पेंड १,७०० रुपयांना मिळत असताना आता तो १,९५० ते २,००० रुपयांपर्यंत मिळत आहे. एका बाजूला पशुखाद्य आणि चाऱ्याचे दर गगनाला भिडलेले असताना, दुधाचे दर मात्र सातत्याने कमी होत आहेत. ग्रामीण भागातील दूध डेअऱ्यांमध्ये सध्या ३४ ते ३५ रुपये प्रतिलिटर दुधाचा दर आहे.



त्यामुळे वाढलेला खर्च आणि मिळणारा अल्प दर यामध्ये ताळमेळ बसत नाही. मागील वर्षी झालेल्या अवकाळी पावसामुळे शेती मोठ्या प्रमाणावर नुकसानात गेली. या परिस्थितीत अनेक शेतकऱ्यांनी शेती चालू ठेवण्यासाठी स्वतःच्या बचतीतून जनावरे आणि चारा खरेदी केले, पण आता परिस्थिती अशी झाली आहे की जनावरे ठेवणेही अवघड झाले आहे. त्यामुळे शेतकरी आणि पशुपालक अक्षरशः हैराण झाले आहेत. दर वाढीमुळे अनेक पशुपालक पर्यायी खाद्यांकडे वळले आहेत. ते जास्त खर्च करूनही जनावरांना पोषक आहार देण्याचा प्रयत्न करत आहेत, जेणेकरून दूधाची गुणवत्ता टिकवता येईल. तरीही हा उपाय संपूर्णपणे टिकाव धरू शकत नाही, कारण खर्च जास्त आणि मिळणारा भाव कमी आहे. सरकारने लवकरात लवकर पशुखाद्य, खते यांच्या वाढलेल्या दरांवर नियंत्रण आणावे, तसेच शेतकऱ्यांना व पशुपालकांना योग्य आर्थिक आधार द्यावा, अशी मागणी सध्या जोर धरत आहे. नाहीतर दूध व्यवसाय टिकवणे आणि जनावरांचे पालन करणे दिवसेंदिवस कठीण होईल.

उपाय शोधण्याची गरज

शेतकरी संघटना आणि पशुपालक यांना या परिस्थितीवर तातडीने उपाय हवा आहे. त्यांना शेतमालाला योग्य हमीभाव मिळावा, पशुखाद्यच्या दरांवर नियंत्रण आणावे आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली जात आहे. अनेकांची आर्थिक स्थिती इतकी बिकट झाली आहे की आता त्यांना ४०४२ रुपये प्रतिकिलो दर आणि ५० किलो बॅग सरकी पेंड १,९५०२,००० रुपयांना मिळत असताना ही मदत अत्यंत गरजेची आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७८८ : इंग्लडमधून हद्दपार केलेले गुन्हेगार वसाहतीसाठी ऑस्ट्रेलियातील न्यू साऊथ वेल्सच्या किनार्यावर उतरले. इथे वसाहत करण्यासाठी तयार झालेल्या गुन्हेगारांची शिक्षा माफ करण्यात आली होती.

१८४१ : ब्रिटिशांनी हाँगकाँग बेटाचा ताबा घेतला.

१९३७ : फ्रँकलिन डिलानो रूझवेल्ट यांनी अमेरिकेचे ३२ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून अमेरिकेच्या अध्यक्षपदाची शपथ घेतली. यानंतर २० जानेवारीलाच अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा शपथविधी करण्याची प्रथा पडली.

१९४४ : दुसरे महायुद्ध रॉयल एअर फोर्सने बर्लिनवर २३०० टन बॉम्बवर्षाव केला.

१९४८ : महात्मा गांधींची हत्या करण्याचा चौथा प्रयत्न झाला. याआधी १९३४, १९४४ व १९४४ मध्ये त्यांची हत्या करण्याचे प्रयत्न झाले होते.

१९५७ : आशियातील पहिली अणुभट्टी पंतप्रधान पंडित जवाहरलालनेहरू यांच्या हस्ते देशाला अर्पण करुन अ‍ॅटॉमिक एनर्जी एस्टॅब्लिशमेंट (सध्याचे नाव भाभा अणुसंशोधन केंद्र) या संस्थेची स्थापना करण्यात आली.

१९६३ : चीन व नेपाळ या देशांत सरहद्दविषयक करार झाला.

१९६९ : क्रॅब नेब्युलात प्रथमत: पल्सार दिसून आला.

१९९८ : संगीत क्षेत्रातील नोबेल समजला जाणारा 'पोलार संगीत पुरस्कार' विख्यात सतारवादक पं. रविशंकर यांना जाहीर

१९९९ : गिरीश कर्नाड यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर

२००९ : अमेरिकेचे पहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांचा शपथविधी झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७५ : आंद्रे अ‍ॅम्पिअर फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १० जून १८३६)

१८६१ : मराठीमधील पहिल्या स्त्री कथा-कादंबतीकार, निबंधकार आणि सुधारक काशीबाई गोविंदराव कानिटकर यांचा जन्म.

१८७१ : सर रतनजी जमसेटजी टाटा टाटा घराण्यातील उद्योगपती व दानशूर व्यक्ति (मृत्यू: ५ सप्टेंबर १९१८)

१८८९ : महान देशभक्त आणि तपस्वी मसुरकर महाराज यांचा जन्म.

१८९८ : कृष्णाजी गणेश फुलंब्रीकर तथा 'मास्टर कृष्णराव' प्रतिभावान गायक, अभिनेते व संगीतकार, त्यांच्या गायनात ग्वाल्हेर, आग्रा व जयपूर घराण्यांचा संगम दिसून येई. 'वंदे मातरम'ला त्यांनी दिलेली चाल लोकप्रिय ठरली. (मृत्यू: २० आक्टोबर १९७४)

१९३० : चंद्रावर उतरणारे दुसरे अमेरिकन अंतराळवीर बझ आल्ड्रिन यांचा जन्म.

१९६० : आपा शेर्पा १९ वेळा माऊंट एव्हरेस्टवर यशस्वी चढाई करणारे नेपाळी गिर्यारोहक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९१ : डेविड कालाकौआ हवाईचा राजा (जन्म: १६ नोव्हेंबर १८३६)

१९३६ : जॉर्ज (पाचवा) इंग्लंडचा राजा (जन्म: ३ जून १८६५)

१९५१ : अमृतलाल विठ्ठलदास ठक्कर ऊर्फ 'ठक्कर बाप्पा' समाजसेवक (जन्म: २९ नोव्हेंबर १८६९)

१९८० : कस्तुरभाई लालभाई दानशूर व राष्ट्रवादी विचारसरणीचे उद्योगपती, पद्मभूषण (१९६९), रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक (१९३७ १९४९). अरविंद मिल्स, अशोक मिल्स, अतुल असे अनेक गिरण्या व कारखाने त्यांनी चालू केले. आपल्या गिरण्यांत त्यांनी कामगार कल्याणासाठी सहकार संस्था काढल्या. (जन्म: १९ डिसेंबर १८९४)

१९८८ : खान अब्दुल गफार खान तथा 'सरहद गांधी' (जन्म: ३ जून १८९०)

१९९३ : ऑड्रे हेपबर्न ब्रिटिश अभिनेत्री, संयुक्त राष्ट्रांच्या बालक निधीच्या सदिच्छा प्रतिनिधी, 'रोमन हॉलिडे' या चित्रपटातील अभिनयाबद्दल त्यांना ऑस्कर पुरस्कार मिळाला. (जन्म: ४ मे १९२९)

२००२ : रामेश्वरनाथ काओ रिसर्च अँड अ‍ॅनॅलेसिस विंग () या भारतीय गुप्तचर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष. काओ यांना भारतीय गुप्तचर यंत्रणेचे अध्वर्यू मानण्यात येते. (जन्म: १० मे १९१८)

# सोयाबीनचा ओलावा कमी करण्यासाठी उपाययोजना



राज्यातील अनेक बाजार समित्यांमध्ये सध्या सोयाबीनला अपेक्षित दर मिळत नाही. मुख्य कारण म्हणजे धान्यात जास्त ओलावा. ओलसर सोयाबीन व्यापाऱ्यांना कमी भावाची वाटते किंवा काही वेळा ते खरेदीच टाळतात. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. पण काही सोपे उपाय अवलंबून तुम्ही सोयाबीनची आद्रता कमी करू शकता आणि चांगला बाजारभाव मिळवू शकता.

ओलावा का वाढतो? : एक्स्पर्टच्या मते, सोयाबीनमध्ये ओलावा वाढण्याची कारणे अशी आहेत जसे की अनियमित पाऊस आणि सकाळी पडणारी दव,ढगाळ हवामान आणि पिकाची घाईने केलेली काढणी होय.

सामान्यतः बाजारात १०१२ टक्के ओलावा स्वीकारला जातो. त्याहून जास्त ओलावा असल्यास सोयाबीचा दर मोठ्या प्रमाणात कमी होतो. त्यामुळे शेतकरी ओलावा कमी करण्याचे उपाय शोधत आहेत.

सोयाबीनचा ओलावा कमी करण्याचे सोपे उपाय : कडक उन्हात वाळवणे,सोयाबीनचे दाणे अंगणात किंवा मोकळ्या जागेत पसरवा.दर ३०४० मिनिटांनी ढवळा, ज्यामुळे दाण्यांवर सर्व बाजूंनी सूर्यप्रकाश लागतो.२३ दिवसात ओलावा नैसर्गिकरीत्या कमी होतो.प्लास्टिक शीट किंवा ताडपत्रीचा वापर करा.धूळ, माती किंवा ओलसर जमिनीचा संपर्क टाळण्यासाठी प्लास्टिक शीट किंवा ताडपत्रीवर धान्य वाळवा.दाणे स्वच्छ राहते आणि व्यापाऱ्यांना "सरस दाणा" म्हणून अधिक दर मिळतो.

धान्याची स्वच्छता / पॉलिश : काडी, पाने आणि मातीचे कण आधी काढून टाका.स्वच्छ धान्य लवकर कोरडे होते.तसेच काही ठिकाणी छोटे पॉलिश मशीनही वापरता येतात, जे दाण्यांचा ओलावा कमी करतात.

ग्रेन ड्रायरचा वापर : कृषी केंद्रे, सहकारी संस्था किंवा खाजगी व्यापाऱ्यांकडे धान्य वाळवण्यासाठी ड्रायर उपलब्ध असतात.ड्रायरमध्ये ३४ तासांत धान्य वाळते.पावसाळा किंवा सतत ढगाळ हवामानात हा उपाय जास्त फायदेशीर ठरतो.थोडा खर्च लागू शकतो, पण नंतर मिळणारा चांगला बाजारभाव हा खर्च भरून काढतो.

# 'या' पक्षांच्या संगोपनातून मिळणार कोंबड्यांपेक्षा अधिक उत्पन्न!

शेतीपूरक व्यवसायाचे सध्या वेगवेगळे पर्याय शेतकऱ्यांसमोर येत आहेत, जे जास्त फायदेशीर आणि उपयुक्त आहेत. असाच एक व्यवसाय आहे गिनी फॉल्स फार्मिंग. गिनी फॉल्स यांना टर कोंबडी किंवा ऑस्ट्रेलियन टर्की या नावाने सुद्धा ओळखतात.

देशात शेतकरी मोठ्या प्रमाणात गिनी फॉल्स फार्मिंग करत आहेत, यामुळे त्यांना चांगले पैसे मिळत आहेत. गिनी फाऊल या पक्षांना जास्त देखभालीची आवश्यकता नसते, त्यामुळे त्यांच्या संगोपनासाठी कमी खर्च येतो. गिनी फॉउलचे मांस आणि अंडी कोंबडीपेक्षा जास्त किंमतीला विकली जातात.

देशातील अनेक राज्यांमध्ये शेतकरी गिनीफाऊलचे मोठ्या प्रमाणात पालनपोषण करत आहेत, ज्यामुळे त्यांना चांगले पैसे मिळत आहेत. हे पक्षी एक उत्तम रखवालदार म्हणून सुद्धा ओळखले जाते. कोंबड्यांना साप, मुंगुस, घूस यापासून वाचवण्यासाठी या पक्षांचा चांगला उपयोग होतो. तुम्हालाही कमी खर्चात चांगला कमाईचा व्यवसाय करायचा असेल तर गिनी फॉल फार्मिंग चांगला पर्याय आहे.

गिनी फाऊल आपल्या शरीराला हवामानानुसार अनुकूल बनवतो, त्यामुळे थंडी, उष्णता आणि पावसाचा त्यावर काहीही परिणाम होत नाही. कोंबडीच्या तुलनेत हा पक्षी क्वचितच हंगामी रोगांचा बळी पडतो. गिनी फॉउलचे मांस आणि अंडी कोंबडीपेक्षा चवदार असतात. बाजारात या पक्षाचे एक अंडे २० रुपये या किमतीला विकले जाते. गिनी फाउलचे संगोपन करण्यापूर्वी, तुमच्याकडे त्याच्या ओळखीची अचूक माहिती असणे आवश्यक आहे. गिनी फाऊल त्यांच्या तुऱ्यावरून ओळखले जातात. मादी गिनी फॉउलचा तुरा नरापेक्षा लहान असते. जर तुम्ही याला व्यवसाय म्हणून फॉलो करण्याचा विचार करत असाल, तर तुम्ही ५० गिनी फॉउलसह देखील व्यवसाय सुरु करू शकता. गिनी फाउलच्या अंड्याचे कवच खूप जाड असते, त्यामुळे ते तोडण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते. त्याच वेळी, त्याची अंडी इतर पक्ष्यांच्या अंड्यांपेक्षा सुमारे दोन ते अडीच पट जाड असते आणि ती सहजासहजी खराब होत नाही. ही अंडी १५ ते २० दिवस टिकवून ठेवता येतात.

वर्षातून १०० अंडी : गिनी फाऊल एका वर्षात सुमारे १०० अंडी घालतात. बाजारात एका अंड्याचा भाव १७ ते २० रुपये असून मांसाला चांगली मागणी आहे. तुम्ही हा व्यवसाय ५० गिनी फॉउलसह सुरू केल्यास, तुम्ही एका वर्षात कुक्कुटपालनापेक्षा ४ पट अधिक कमाई करू शकता.



# मातीचा पीएच किती असावा आणि तो बिघडण्याची कारणे

मानवी आरोग्यविषयक समस्यांमुळे सेंद्रिय शेतमालाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. उत्पादन कमी होत असल्याने तसेच समाधानकारक दर मिळत नसल्याने शेतकरी सेंद्रिय शेतमालाचे उत्पादन घेण्यास उत्सुक नसतात. पिके त्यांना आवश्यक आलेली अन्नद्रव्ये मातीतून मुळांवाटे शोषून घेतात. मातीत मिसळलेली अन्नद्रव्ये सेंद्रिय आहेत की रासायनिक याची ओळख पिकांना करता येत नाही. मातीतील आम्लता किंवा क्षारता मोजण्याला 'पीएच' संबोधले जाते. ७.० हा तटस्थ किंवा नैसर्गिक पीएच मानला जात असला तरी पिकांच्या उत्तम उत्पादनासाठी ६.० ते ७.५ दरम्यानचा 'पीएच' आदर्श मानला जातो. कारण या रेंजमध्ये बहुतेक पोषक तत्वे पिकांना सहज उपलब्ध होतात व त्यांची चांगली वाढ होते.




पीएच व त्याचे कमी-अधिक प्रमाण : १) पीएच ५.५ पेक्षा कमी असले तर ती माती जास्त आम्लधर्मी होते. ज्यामुळे फॉस्फरस हा लोह व अ‍ॅल्युमिनियमच्या बंधनात अडकल्याने पिकांना मिळत नाही. अ‍ॅल्युमिनियम, मँगनीज घातक ठरतात. २) पीएच ८.० पेक्षा जास्त असेल तर ती माती जास्त अल्कधर्मी होते. ज्यामुळे पिकांना झिंक, लोह, बोरोन, मँगनीज हे अन्नद्रव्ये मिळत नाही. त्यामुळे पिकांची पाने पिवळी पडतात व वाढ खुंटते. ३) बिघडलेल्या पीएचमुळे माती जिवंत ठेवणारे जिवाणू मृतवत होतात व बुरशी वाढते तसेच नायट्रोजनचे स्थिरीकरण मंदावते.

पीएचचा असमतोल व त्याचे दुष्परिणाम : १) जमिनीत क्षारांचे प्रमाण अधिक असणे, सिंचनाच्या पाण्याचा अतिवापर करणे किंवा पाण्याची कमतरता भासणे, परस्पर विरोधी खते एकत्र मिसळून देणे, खतांचा अतिवापर, सेंद्रिय पदार्थांची कमतरता, परस्पर विरोधी अन्नद्रव्ये यामुळे पीएचचा असमतोल निर्माण होतो. २) क्षारांचे प्रमाण वाढल्यास पाण्याचा योग्य निचरा होत नाही, ऑस्मोटिक दाब वाढतो व झाडांना पाणी व अन्नद्रव्ये शोषणे कठीण जाते. ३) पीएच खूप आम्लधर्मी किंवा अल्कधर्मी असल्यास पिकांच्या मुळांना नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम हे मुख्य अन्नद्रव्ये मिळत नाही. ४) चिकट किंवा जड जमीन असल्यास हवा खेळती राहत नसल्याने पाणी व अन्नद्रव्यांची हालचाल मंदावते. सेंद्रिय पदार्थांच्या कमतरतेमुळे जमिनीची धारणशक्ती व अन्नद्रव्ये संतुलन बिघडते.

खत व पाणी व्यवस्थापनातील चुका : १) अतिपाणी दिल्यास खते मुळांच्या भागातून वाहून जातात किंवा मुळकुज होते. खत दिल्यानंतर पाणी न दिल्यास नायट्रोजन उडून जाते. २) मुळांभोवती क्षार साचल्यास पिकांच्या मुळांना इजा होते. खतांच्या अतिवापरामुळे क्षारदाह होतो. ३) युरिया व अमोनियम नायट्रेटसारखी विसंगत खते एकत्र मिसळल्यास विद्राव्यता कमी होत असल्याने त्यांचे शोषण होत नाही.

उपाय : १) आम्लधर्मी मातीला चुना, डोलोमाइट, बायोचार व राख तसेच अल्कधर्मी जमिनीला जिप्सम, सल्फर, सेंद्रिय पदार्थांची जोड आवश्यक असते. हे उपाय तो माती परीक्षणानंतर करणे गरजेचे आहे. चांगल्या उत्पादनासाठी पाणी तसेच नांगरणीच्या आधी मातीची चाचणी व प्रत्येक खत वापराआधी मातीचा स्वभाव ओळख विचारात घेऊन उपाययोजना करणे गरजेचे असते. २) खते देताना समतोल पाणी व्यवस्थापन ठेवणे. पिकांची गरज व हंगामानुसार संतुलित खतांचा वापर करणे. नायट्रोजन दिल्यानंतर तात्काळ पाणी देणे. सेंद्रिय खतांचा वापर करून जमिनीची रचना व हवा खेळती ठेवणे. अन्नद्रव्य संतुलन राखणे.

# ना.पंकजाताई मुंडे यांच्यामुळे बंजारा समाजातील शेतमजुराच्या मुलीला मिळाले जीवनदान

## पालकांसह ग्रामस्थांनी मानले आभार

जालना। प्रतिनिधी

वंचित/ पिडीतांसाठी नेहमीच पुढाकार घेवुन काम करणाऱ्या राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्यामुळे बंजारा समाजातील एका शेतमजुराच्या मुलीला दवाखान्यात वेळीच उपचार झाल्याने जीवनदान मिळाल्याचा प्रत्यय नुकताच आला. आपली मुलगी संकटातून सुखरूपपणे बाहेर आल्याचे बघताच पालकांना आनंदाश्रु रोखता आले नाहीत. या संकट काळात केलेल्या सहकार्याबद्दल तिच्या पालकांसह ग्रामस्थांनी ना.पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

झाले असे की, अंबड (जि.जालना) तालुक्यातील कुक्कडगाव येथील कृष्णा धोंडीराम राठोड हया शेतमजूराची कौटूंबिक स्थिती अत्यंत नाजुक होती, त्यांचे पुर्णपणे हातावर पोट आहे. शेतमजुरी आणि मोलमजुरी करून आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कृष्णा राठोड यांच्यावर निसर्गाच्या एका अजब घटनेतून जणू दु:खाचा डोंगरच कोसळला होता. त्यांच्या पंधरा वर्षे वयाच्या मुलीला गेल्या अवघ्या तीन महिन्याच्या कालावधीत सापाने चक्क सातवेळा दंश केला, या अजब प्रकाराने



तिला सात वेळा दवाखान्यात नेण्याची वेळ आली. प्रत्येक वेळी तिचा जीव वाचविण्यासाठी कृष्णा राठोड यांनी कर्ज काढून, उसनवारी करुन उपचाराचा खर्च केला. पुढील उपचारासाठी त्यांच्याकडे एकही रुपया शिल्लक नव्हता. या गरीबीतुन मुलीला कसे वाचवायचे ? हा प्रश्न त्यांना सतावत असतानाच त्यांनी जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्याशी संपर्क केला आणि ही व्यथा सांगितली. ना.पंकजाताई यांनी तात्काळ संबंधित हॉस्पिटल मधील डॉक्टरांशी संपर्क साधुन सदर मुलीवर उपचार करण्याच्या सूचना केल्या. डॉक्टरांनी देखील माणुसकीच्या भावनेतून तात्काळ मुलीला सर्व औषधोपचार करुन तिला संकटातून बाहेर काढले. आता ती मुलगी सुखरूप आहे. ना.पंकजाताई मुंडे यांच्यामुळे शेतमजुराची मुलगी संकटातून सुखरुपपणे बाहेर पडल्याबद्दल तिचे वडील कृष्णा राठोड व कुक्कडगाव येथील ग्रामस्थांनी ना.पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

# राष्ट्रवादीच्या पराभूत उमेदवारांची विचार मंथन बैठक



जालना। प्रतिनिधी

त्याच झालेल्या जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक मधील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या पराभूत उमेदवारांची विचार मंथन बैठक आज दि.१८ रविवार रोजी जिल्हा कार्यालयात जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण यांनी पराभूत उमेदवारांसोबत साधक-बाधक चर्चा करून उमेदवारांना बोलताना म्हणाले की, निवडणुकीत पराभव झाला म्हणून खचून जाऊ नका.

निवडणुकीमध्ये जय - पराजय हे होत असतात ते पचवून जिद्दीने व ताकतीने पुन्हा कामाला लागले पाहिजे.आपल्या पक्षातील सर्वच उमेदवार या निवडणुकीसाठी प्रथमच मैदानात उतरले होते. त्यामुळे आपण या अनुभवातून शिकले पाहिजे.

सतत लोकांच्या संपर्कात राहून सामाजिक कार्यात अग्रेसर राहिले पाहिजे. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, अल्प कालावधीत होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका या एकजूटीने लढवू व निश्चितच विजय मिळवू असे ही बोलताना ते म्हणाले. यावेळी बैठकीस शेख मेहमूद, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष, युवक प्रदेश सरचिटणीस धैर्यशील चव्हाण, प्रा सोपान तेलगड तसेच महानगरपालिका निवडणूकीतील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे उमेदवार उपस्थित होते.

# अहिल्यानगर मनपातील विजयी नगरसेवक अनिता शेटीया यांचा शानदार विजय

बीड। प्रतिनिधी

भाजपा राष्ट्रवादी महायुतीच्या सौ.अनिता विपुल शेटिया अहिल्यानगर महानगरपालिकेत सर्वाधिक ५००० मतांनी विजयी झालेल्या आहेत. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील सुभाषभाऊ छाजेड यांची कन्या सौ. अनिता विपुलजी शेटीया यांनी अहिल्यानगर महापालिकेत नगरसेविका म्हणून विजयी झाल्यामुळे सर्व स्तरातून अभिनंदन



कौतुक व शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे. चकलांबा आणि बीड शहरात छाजेड यांचे नातेवाईकांनी मित्र परिवारांनी या विजयामुळे आनंद व्यक्त केला. अनिता यांचे पती विपुल शेटीया हे मागील १० वर्षापासून नगरसेवक आहेत. त्यांचे सामाजिक, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान आहे. प्रभागातील विविध कामे केल्यामुळे नागरिकांशी शेटिया कुटुंबीयांशी नाते घट्ट झाले आहे.

# अंबड नगर परिषदेची पहिली सर्वसाधारण सभा संपन्न

## उपनगराध्यक्ष व नामनिर्देशित २ सदस्यांची बिनविरोध निवड




**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड नगर परिषदेची उपनगराध्यक्ष व नामनिर्देशित सदस्य निवडीसंदर्भातील पहिली सर्वसाधारण सभा पंडित दीनदयाळ उपाध्याय सभागृहातील भालचंद्र सभागृहात पार पडली. ही सभा नगराध्यक्षा देवयानी केदार दादा कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेस नगर परिषदेचे सर्व नवनिर्वाचित सदस्य उपस्थित होते.**

सभेच्या प्रारंभी मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी उपस्थित सदस्यांना पहिल्या सर्वसाधारण सभेचे स्वरूप, उपनगराध्यक्ष निवड व नामनिर्देशित सदस्य निवडीसंबंधी कायद्यातील व नियमातील तरतुदींची माहिती दिली.उपनगराध्यक्ष पदासाठी भारतीय जनता पक्षाकडून विश्वजीत विलासराव खरात यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. तसेच नामनिर्देशित सदस्य पदासाठी भारतीय जनता पक्ष व राष्ट्रीय समाज पक्ष गटाकडून ठाकुर धनराज दीपकसिंह आणि सोडाणी सुहास रमेशचंद्र यांची नावे सुचविण्यात आली. राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार गट), भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस गटाकडून कोणतेही नामनिर्देशन दाखल न झाल्याने ठाकुर धनराज दीपकसिंह व सोडाणी सुहास रमेशचंद्र यांची अंबड नगर परिषदेच्या नामनिर्देशित सदस्यपदी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. या सभेचे कामकाज यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयीन अधिक्षक सुधीर जाधव, सभा अधिक्षक रामेश्वर घोळवे, सभा लिपिक उमेश खरात, स्वच्छता निरीक्षक परमेश्वर शिंदे, कर निरीक्षक के. के. देशपांडे, अहमद शेख, विलास खरात, संतोष खरात, लेखापाल भाऊसाहेब म्हसे, लेखापाल श्री तुपे, अनिकेत दानवे, भारत जाधव, संजय परदेशी,अजय मांडवे, ज्ञानेश्वर शेळके तसेच नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जाहीर प्रगटन

**मा.श्री. व्ही.सी. जोशी, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १३३/२०२६**

**ॲड. एस.आर. उजगरे यांच्यामार्फत**

**सत्यभामा भ्र. सदाशिव चक्रे वि. निरंक**

ज्यापेक्षा सदाशिव कोंडीबा चक्रे हे दिनांक ११.१२.२०२५ रोजी पंचशिल नगर, पालवण रोड, बीड, ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार

१. सत्यभामा भ्र. सदाशिव चक्रे, वय ७६ वर्षे, धंदा घरकाम, रा. पंचशिल नगर, बीड, ता.जि. बीड. २. राहुल पि. सदाशिव मांडवखेलकर गॅजेट नुसार (राहुल पि. सदाशिव चक्रे पुर्वीचे नाव) वय ३९ वर्षे, धंदा क्लासेस, रा. पंचशिल नगर, बीड, ता.जि. बीड. ३. मिना भ्र. गौतम गायकवाड, वय ५७ वर्षे, धंदा घरकाम, रा. महात्मा फुलेनगर, ज्योत्स्ना कॉलनी, उल्हासनगर-५, जि. ठाणे. ह.मु. रा. पंचशिल नगर, बीड, ता.जि. बीड. ४. छाया भ्र. पंडित गायकवाड, वय ५४ वर्षे, धंदा घरकाम, रा. पंचशिल नगर, पालवण रोड, बीड, ता.जि. बीड. ५. महादेवी पि. सदाशिव चक्रे, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. पालवण रोड, पंचशिल नगर, बीड, ता.जि. बीड. अर्जदार क्रं. १ ही मयत नामे सदाशिव कोंडीबा चक्रे यांची पत्नी आहे तर अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. तसेच अर्जदार क्रं. ३ ते ५ या मयताच्या मुली आहेत. अर्जदार क्रं. २ याचे नाव गॅजेट नुसार राहुल सदाशिव चक्रे चे 'राहुल सदाशिव मांडवखेलकर' असे झालेले आहे, सोबत गॅजेटची प्रत जोडली आहे. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदाराचे म्हणणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत सदाशिव कोंडीबा चक्रे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २६/०२/२०२६ आहे.

आज दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावरुन**

**स्वाक्षरीत/-**<br>**क. लिपीक**

**स्वाक्षरीत/-**<br>**अधिक्षक**<br>**दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड**<br>**क. लिपीक**

# नगर तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सुनील चोभे बिनविरोध

अहिल्यानगर। प्रतिनिधी

नगर तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सुनील चोभे यांची, तर उपाध्यक्षपदी बाळासाहेब गदादे, सचिवपदी शशिकांत पवार, खजिनदारपदी अविनाश निमसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

नगर तालुका पत्रकार संघाची वार्षिक बैठक नुकतीच ज्येष्ठ पत्रकार लहुकुमार चोभे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यात अध्यक्षपदासाठी माजी अध्यक्ष सुनील हारदे यांनी चोभे यांच्या नावाची सूचना मांडली. या सूचनेस उपस्थित सर्वांनी अनुमोदन दिले. त्यानंतर इतर पदाधिकाऱ्यांचीही निवड सर्वानुमते करण्यात आली. बैठकीस माजी अध्यक्ष योगेश गुंड, जितेंद्र निकम, नितीन देशमुख, नागेश सोनवणे, ज्ञानदेव गोरे, आजिनाथ शिंदे, संजय ठोंबरे, भाऊ होळकर आदी पत्रकार उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष चोभे म्हणाले, पत्रकार संघाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले जातील. पत्रकारांचे हित जपताना समाजोपयोगी उपक्रम राबवण्यावर भर दिला जाईल. पत्रकार संघ अधिक सक्षम, संघटित आणि लोकाभिमुख करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करू. नगर तालुका पत्रकार संघाच्या माध्यमातून पत्रकारांचे प्रश्न, नागरिकांच्या अडचणी तसेच सामाजिक प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी संघ कटिबद्ध राहील, असा विश्वास यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# तामलवाडीत आनंद बाजारातून विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञानाचे धडे

## आनंद बाजारात पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांसह २०० विद्यार्थ्यांचा सहभाग

तामलवाडी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तामलवाडी येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी बाल आनंद बाजार या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष असिफ शेख व मुख्याध्यापक राजाराम वाघमारे यांच्या शुभहस्ते उत्साहात संपन्न झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून एपीआय गोकुळ ठाकूर तसेच प्राचार्य सुहास वडणे यांची प्रमुख उपस्थिती होती. या बाल आनंद बाजारात शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या जवळपास २०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शालेय वयातच विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञानाचे धडे मिळावेत, मुलांमध्ये व्यावसायिक दृष्टी विकसित व्हावी व खरेदी-विक्रीचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. याशिवाय काही लहानग्यांनी दैनंदिन वापरातील लहान वस्तू विक्रीसाठी ठेवल्या होत्या. त्यामुळे हा आनंद बाजार विद्यार्थ्यांसाठी केवळ खरेदी-विक्रीपुरता मर्यादित न राहता खरा अनुभवाधिष्ठित शिक्षणाचा केंद्रबिंदू ठरला.प्राचार्य सुहास वडणे यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक पैशांचा योग्य उपयोग कसा करावा या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना खरी कमाई कशी होते याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. वस्तूची खरेदी-विक्री कशी करावी, आलेल्या पैशांचा हिशोब कसा ठेवावा, सुट्टे पैसे परत देणे, नफा-तोटा ओळखणे, पैशांचा योग्य उपयोग कसा करावा आणि खर्चाचे नियोजन कसे करावे. यासारख्या अनेक महत्त्वाच्या बाबी विद्यार्थ्यांनी अनुभवातून शिकल्या. शिक्षणासोबतच व्यवसायदृष्टी रुजवणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये वेगळा आत्मविश्वास निर्माण करून गेला. ग्रामस्थांनी घेतला मनसोक्त आस्वाद : शाळेच्या प्रशस्त प्रांगणात सुमारे १५० विद्यार्थ्यांनी स्वतःचे स्टॉल उभारून विविध वस्तू विक्रीसाठी ठेवल्या होत्या.

# आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची वॉलस्टार टेक्नॉलॉजी येथे औद्योगिक भेट

बीड

आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य पॉलिटेक्निक बीड येथील कंप्युटर सायन्स अँड इंजिनीअरिंग विभागाच्या द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी १७ जानेवारी २०२६ रोजी वॉलस्टार टेक्नॉलॉजी प्रा.ली., कोल्हापूर या नामांकित आयटी सॉफ्टवेअर कंपनीस औद्योगिक भेट दिली. या भेटीत ४१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यांना आयटी उद्योगातील प्रत्यक्ष कार्यपद्धती समजून घेण्याची संधी मिळाली. या भेटीचे आदित्य पॉलिटेक्निक व वॉलस्टार टेक्नॉलॉजी यांच्यात सामंजस्य करार झाल्याने विद्यार्थांना याचा मोठा फायदा होणार आहे.




संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर उद्योगातील आधुनिक तंत्रज्ञान, प्रोजेक्ट डेव्हलपमेंटची प्रक्रिया आणि व्यावसायिक वातावरणाची प्रत्यक्ष ओळख करून देण्यात आली. वेब व मोबाईल ॲप्लिकेशन तयार करताना कोणत्या टप्प्यांतून काम केले जाते, टीमवर्क कसे असते आणि ग्राहकांच्या गरजेनुसार सोल्युशन कसे विकसित केले जाते, याची माहिती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे समजावून सांगण्यात आली. या भेटीतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे आदित्य पॉलिटेक्निक, बीड आणि वॉलस्टार टेक्नॉलॉजी प्रा.ली., कोल्हापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे भविष्यात विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, कार्यशाळा, औद्योगिक प्रकल्प आणि प्रॅक्टिकल आधारित शिक्षणाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. वॉलस्टार टेक्नॉलॉजीच्या बिझनेस डेव्हलपमेंट टीमने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सॉफ्टवेअर क्षेत्रातील करिअर संधी, आवश्यक कौशल्ये, सायबर सिक्युरिटीचे महत्त्व, स्टार्टअप कंपन्यांमधील संधी तसेच भविष्यातील तंत्रज्ञान ट्रेंड्स याबाबत सविस्तर माहिती दिली. कंपनीच्या वर्किंग स्ट्रक्चरची माहिती मिळाल्याने विद्यार्थ्यांना आयटी उद्योगातील कार्यसंस्कृती समजण्यास मदत झाली. या औद्योगिक भेटीबद्दल विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले असून, या अनुभवामुळे भविष्यातील करिअरसाठी योग्य दिशा मिळाल्याचे त्यांनी सांगितले. आदित्य पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनामुळे ही औद्योगिक भेट यशस्वीरित्या पार पडली.यावेळी विभाग प्रमुख सलीम शेख , प्रा. अंकुर कांबळे, प्रा. सूरज शिंदे, प्रा. मुस्कान पठाण मॅडम, प्रा. पूजा जाधव मॅडम, प्रा. शिवानी जाधव मॅडम, प्रा. मिन्हाज शेख मॅडम यांची उपस्थिती होती.

क्र.२०२५/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि<br>कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदारअंबाजोगाई<br>दि.१३/०१/२०२६

**जाहिरनामा**

**जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ ० मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, अर्जदार श्री. खारेख जलील कुरेशी रा.घाटनांदूर ता. अंबाजोगाई यांचा जन्म दिनांक २०.०१.१९९३ रोजी राहत्या घरी मौजे घाटनांदूर ता. अंबाजोगाई येथे झाला असून अर्जदारांनी जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदाराचे यांचे कायदेशीर जन्माची दिनांक २०/०१/१९९३ कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

स्वाक्षरित<br>कार्यकारी दंडाधिकारी तथा<br>तहसीलदार अंबाजोगाई

क्र.२०२५/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि<br>कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदारअंबाजोगाई<br>दि.१३/०१/२०२६

**जाहिरनामा**

**जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ ० मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, अर्जदार श्री. लायक जलील कुरेशी रा.घाटनांदूर ता. अंबाजोगाई यांचा जन्म दिनांक २७.०३.१९९६ रोजी राहत्या घरी मौजे घाटनांदूर ता. अंबाजोगाई येथे झाला असून अर्जदारांनी जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदाराचे यांचे कायदेशीर जन्माची दिनांक २७.०३.१९९६ कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

स्वाक्षरित<br>कार्यकारी दंडाधिकारी तथा<br>तहसीलदार अंबाजोगाई

# गंगापूर आठवडे बाजारातील बेकायदा वसुलीला लगाम

गंगापूर। प्रतिनिधी

येथील आठवडे बाजारात गेल्या अनेक महिन्यांपासून गोरगरीब शेतकरी व छोटे दुकानदारांकडून नगरपालिका वसुलीच्या नावाखाली सुरू असलेल्या बेकायदा खंडणी वसुलीला अखेर आळा बसला आहे. स्वयंघोषित ठेकेदारांकडून विना पावती होत असलेल्या लुटीबाबत नगरपरिषद प्रशासनाने तत्काळ दखल घेतली.

आठवडे बाजारात तालुक्यातील शेतकरी व छोटे व्यापारी आपली दुकाने लावतात. मात्र, काही ठेकेदारांकडून दमदाटी करत ५० ते १०० रुपये, तर शेव-चिवडा विक्रेत्यांकडून चक्क ५०० ते १ हजार रुपयांपर्यंत विना पावती वसुली केली जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. याबाबत काही दुकानदारांनी गंगापूर नगरपरिषदेकडे लेखी तक्रार केली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत नगराध्यक्ष संजय जाधव, उपनगराध्यक्ष अमोल जगताप, नगरसेवक अख्तरभाऊ सय्यद, नगरसेवक नवनाथ कानडे तसेच सामाजिक कार्यकर्ते राहुल वानखेडे, सागर शेजवळ, शरद दारुंटे व सोहेल यांनी नगर परिषदेचे कर्मचारी बरोबर घेत थेट आठवडे बाजारात भेट देऊन शेतकरी दुकानदारांशी संवाद साधला. यावेळी घटनास्थळी पंचनामा करण्यात आला. संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्याचे आश्वासन देत यापुढे नियमानुसार केवळ १० व २० रुपयांची अधिकृत पावती देऊनच वसुली करावी, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या.न.

आठवडे बाजारात येणाऱ्या शेतकरी व छोट्या दुकानदारांनी बेकायदा लूट होत असल्याने नगरपरिषद पदाधिकाऱ्यांची थेट बाजारात भेट देऊन वसुली करणाऱ्यांना ताकीद दिली. व्यापाऱ्यांची होणारी लट थांबवल्याबद्दल नगरपरिषद पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांचे आभार मानले. या कारवाईमुळे बाजारातील वातावरण अधिक सुरक्षित व दिलासादायक झाल्याची भावना व्यापाऱ्यांनी व्यक्त केली.

# नवनाथ ग्रंथातील गर्भगिरी पर्वत म्हणजेच गोरक्षनाथ टेकडी-नवनाथ बाबा

## गोरक्षनाथ टेकडी येथे लाखो भाविकांच्या मेळ्यात अमृत महोत्सवी सप्ताहाची सांगता

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत श्री ह भ प वै. सदगुरू किसन बाबा महाराज यांच्या कृपाशिर्वादाने व ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज मठाधिपती श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह वर्ष ७५ वे अमृत महोत्सवी वर्षाची सांगता गुरुवर्य शांती ब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या धर्मनाथ बीज विषयी महत्व सांगणारे प्रवचन करण्यात आले ह भ प अक्रूर महाराज साखरे यांच्या काल्याच्या कीर्तन व महाप्रसादाचा महापंगतीने सांगता करण्यात आली. गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी धर्मनाथ बीज का साजरी केली जाते.तिचे काय महत्व आहे हे सांगताना बाबा म्हणाले नवनाथ ग्रंथा मध्ये गुरु मच्छिंद्रनाथ महाराज व गोरक्षनाथ महाराज भ्रमण करताना गोरक्षनाथ महाराजांनी गर्भगिरी पर्वत सोन्याचा केला ते सोन्याचा केलेला गर्भगिरी पर्वत म्हणजेच आपली गोरक्षनाथ टेकडी आहे नाथ संप्रदायात गहिनीनाथ महाराज यांना गुरु गोरक्षनाथ महाराज यांनी ज्ञान दिले तो आज चा दिवस नाथ संप्रदाय मध्ये धर्मनाथ बीज रूपाने साजरा केला जातो



धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह सांगतेचे काल्याच्या कीर्तनात ह भ प अक्रूर महाराज साखरे यांनी नाथांचे ज्ञान गोरक्षनाथ भगवंतांनी सांभाळले तो ज्ञानाचा धर्म रथ धर्म रूपाने गहिनीनाथ महाराज यांना समर्पित केला म्हणून आज ते ज्ञान संपूर्ण जगाला कामी आले आहे अशा ज्ञानाला सर्व नाथ संप्रदायातील नवनाथांनी टिकवले व ज्ञानाचा धर्म रथ म्हणजेच धर्मनाथ बीज हा सोहळा श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सर्व जाती-धर्म पंथ सर्वांना एकत्रित करत गुरुवर्य महंत शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला असे ह भ प अक्रूर महाराज साखरे यांनी काल्याच्या कीर्तनात सांगितले काल्याचे संपन्न झाला.श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे श्री ह भ प वै. सदगुरू किसान बाबा महाराज यांनी ७५ वर्षांपूर्वी धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह सुरवात केली होती त्या सप्ताहचे अमृत महोत्सवी वर्ष असल्याने गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज कुशल मार्गदर्शनाखाली ◀◀ पान ३ वर

### किसान बाबा यांनी सुरू केलेली भाकरीची पंगत परंपरा

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुवर्य वै. सदगुरू किसान बाबा महाराज यांनी परिसरातील गावातून भाकरी जमाकरून टेकडीवर पंगत घेऊन ७० ते ८० गावातील भाविक भक्त घेऊन येतात संपूर्ण ८ दिवस अखंड भाविक भक्तांची भोजन व्यवस्था केली जाते.

### संन्याशाची गुरु शिष्य परंपरा जपणारी गोरक्षनाथ टेकडी

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी हि नाथ संप्रदायातील संन्याशाची गादी आहे येथे गुरुशिष्य परंपरा जपणारी गादी आहे गुरु गोरक्षनाथ महाराज यांच्या साधनेतून, तपाने सिद्ध झालेली भूमी आहे गुरु वै.साधू बाबा महाराज, गुरु वै.किसन बाबा महाराज, गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज अशी गुरु शिष्य परंपरा आहे.

### ऐतिहासिक पार्श्वभूमी आध्यात्मिक महत्व

नवनाथ ग्रंथामध्ये गुरु मच्छिंद्रनाथ महाराज व गुरु गोरक्षनाथ महाराज भ्रमण करताना गोरक्षनाथ महाराजाने सोन्याची विट फेकून सोन्याचा डोंगर केला तोच हा नवनाथ ग्रंथा मधील गर्भगिरी पर्वत म्हणजे गोरक्षनाथ टेकडी

मान्यवरांची उपस्थिती:-मनोज जरांगे पाटील, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, माजी मंत्री बदामराव पंडित, राजेंद्र मस्के, योगेश क्षीरसागर, गंगाधर काळकुटे यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते

# आ.धस यांच्या वाढदिवसानिमित्त महिलांसाठी पंढरपूर, शिखर शिंगणापूर देवदर्शनाचा उपक्रम

**आष्टी । प्रतिनिधी**

**येथील सरपंच अजित घुले यांनी लोकनेते आ. सुरेश आण्णा धस यांच्या २ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या वाढदिवसाच्या औचित्य साधून गावातील दोनशे महिलांसाठी एक आगळावेगळा समाजोपयोगी उपक्रम राबविला.**



या उपक्रमांतर्गत केळसांगवी गावातील महिलांची देवदर्शन यात्रा रविवार, १९ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता केळसांगवी येथून रवाना झाली. विशेष वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती.प्रवासादरम्यान महिलांनी भजन, अभंग, हरिपाठ करत संपूर्ण वातावरण भक्तिमय केले. पंढरपूर येथे श्री विठ्ठलरुक्मिणीचे दर्शन घेतल्यानंतर महिलांनी कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी व गावाच्या विकासासाठी प्रार्थना केली. त्यानंतर शिखर शिंगणापूर येथे श्री शनी महाराजांचे दर्शन घेण्यात आले. ग्रामीण भागातील महिलांना श्रद्धा व अध्यात्माचा अनुभव मिळावा, तसेच त्यांना विरंगुळा व समाधान लाभावे, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. महिलांच्या सुरक्षिततेसह भोजन, पाणी व आरोग्याची योग्य व्यवस्था करण्यात आली होती.या वेळी सहभागी महिलांनी आमदार सुरेश आण्णा धस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत सरपंच अजित घुले यांच्या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. सरपंच अजित घुले यांनी सांगितले की, "नेत्याचा वाढदिवस समाजहितासाठी उपयोगी ठरणाऱ्या उपक्रमातून साजरा करणे हीच खरी अभिवादनाची पद्धत आहे.संपूर्ण देवदर्शन यात्रा शिस्तबद्ध, शांततापूर्ण व उत्साहात पार पडली. केळसांगवी गावाने सामाजिक बांधिलकी जपत एक सकारात्मक आदर्श निर्माण केला आहे.

# फार्मर आयडीतील चुकीच्या क्षेत्रामुळे पोखरा योजनेचा लाभ रखडला

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचवण, कोठारबन, चिखलबीड, सोन्नाखोटा, पिंपळटक्का, रूई, पिंपळा आदी गावांसह संपूर्ण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या फार्मर आयडी (ग्रीस्टेक) मध्ये प्रत्यक्ष नावावरील क्षेत्र चुकीचे दाखवले जात असल्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोखरा) योजनेचा ऑनलाईन अर्ज भरताना मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत.



**दुरुस्ती न झाल्यास तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलनाचा इशारा, तहसीलदारांना दिले निवेदन**

फार्मर आयडी नोंदणीदरम्यान प्रत्येक शेतकऱ्याच्या गटामध्ये क्षेत्र १.९९आर.असे दाखवले जात असून हे पूर्णतः चुकीचे आहे. यामुळे पोखरा योजनेचे ऑनलाईन फॉर्म भरताना जास्तीचे किंवा अपूर्ण क्षेत्र नोंदवले जात असून शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहत आहेत.

या संदर्भात तालुका कृषी कार्यालय, तलाठी व मंडळ अधिकारी यांना वारंवार निवेदने देऊनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. काही गावांचा पोखरा योजनेत समावेश झालेला असतानाही फार्मर आयडीमधील तांत्रिक त्रुटीमुळे शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळत नसल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

याबाबत मा.तहसीलदार वडवणी यांना निवेदन देऊन तहसील कार्यालयामार्फत तात्काळ फार्मर आयडी (ग्रीस्टेक) मध्ये ऑनलाईन दुरुस्तीची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात ◀◀ पान ३ वर

# ग्रामीण रुग्णालय पाटोदा येथे ५५ विद्यार्थ्यांवर यशस्वी लघु शस्त्रक्रिया

पाटोदा । प्रतिनिधी

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (RBSK) ग्रामीण रुग्णालय पाटोदा येथे नुकतेच भव्य लघु शस्त्रक्रिया शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरात तब्बल ५५ विद्यार्थ्यांवर विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या.



जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके, निवासी वैद्यकीय अधिकारी (ठचज) डॉ. लक्ष्मीकांत तांदळे आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नरेश कासट यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर संपन्न झाले. यावेळी सर्जन तथा वैद्यकीय अधीक्षक डॉ. अभिषेक जाधव यांनी स्वतः ५५ विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया केल्या. या महत्त्वपूर्ण उपक्रमावेळी आरएमओ डॉ. लक्ष्मीकांत ◀◀ पान ३ वर

# हळदी कुंकूवाला जाताना महिलांनी दागिने चोरांपासून सावध राहावे - सपोनि वर्षा व्हगाडे

वडवणी । प्रतिनिधी

आत्ताच महिलांचा आनंदाचा सण म्हणून समजला जाणारा मकर संक्राती हा सण झाला परंतु २५ तारखेपर्यंत हळदीकुंकवाचा कार्यक्रमाला दागिने घालून जात असताना एकीने किंवा दोघीने न जाता ग्रुपने जावे. अशावेळी महिलांनी आपल्या दागिने चोरांपासून सावध राहावे.



असे काही आढळल्यास वडवणी पोलीस स्टेशन, नियंत्रण कक्ष किंवा ११२ क्रमांकावर तात्काळ कळवावे असे आवाहन वडवणी पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांनी केले.आहे. रस्त्यावरुन जात असताना अनोळखी किंवा हेल्मेट घालून तोंडाला रुमाल बांधून दोघे किंवा तिघे आपल्या भोवती संशयात पणे फिरताना दिसली तर कींवा काही संशयास्पद व्यक्ती वाटली तर संबंधित पोलीस स्टेशनला कळवावे. कोणी अनोळखी आपला पत्ता विचारत असेल तर त्यांना पत्ता न सांगता तिथुन निघुन जायचे. यासाठी वडवणी पोलीस आपल्या सदैव सोबत आहेत सुरक्षित रहा सतर्क राहा

# महाराष्ट्र राज्य जिल्हा आरोग्य अधिकारी संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी सचिन शेकडे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी बीड जिल्हा परिषदेतील जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. सचिन शेकडे यांची बिनविरोध नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. सचिन शेकडे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी या पदासह विविध पदावर उल्लेखनीय आणि स्तुत्य काम केले आहे. संसर्गजन्य रोग नियंत्रण व प्रतिबंध प्रतिबंधक उपाययोजना, राष्ट्रीय आरोग्य अभियानाची प्रभावी



अंमलबजावणी, प्रशासकीय समन्वय, कर्मचारी कल्याण, शहरी आणि ग्रामीण रुग्ण सेवा सुधारणा, या क्षेत्रात उल्लेखनीय आणि परिणामकारक काम केले आहे.

डॉ. शेकडे यांच्या निवडीचे राज्यभरात सर्वत्र स्वागत करण्यात येत आहे. सार्वजनिक आरोग्य प्रणाली मजबूत करण्यासाठी आणि सर्व आरोग्य अधिकाऱ्यांच्या विविध प्रश्नांना सक्षम नेतृत्व ◀◀ पान ३ वर

# निराधार विभागातील गैरप्रकार तात्काळ थांबवा!

## तहसिल कार्यालयासमोर सलीमबापू यांचे उपोषण

माजलगाव । प्रतिनिधी

येथील तहसील कार्यालयात निराधार विभागामध्ये सुरू असलेला सावळागोंधळ तात्काळ थांबविण्यात यावा.या मागणीसाठी आंबेडकरी विचार मंच व आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सलीमबापू यांनी उपोषण सुरू केले आहे.



माजलगाव तहसील मधील निराधार विभागातील काही कर्मचारी व दलाल मंडळी यांच्या संगनमताने मूळ संचिका उपलब्ध नसताना हयातनामे स्वीकारली जात आहेत.तसेच सन २०२० ते २०२५ या कालावधीत एकूण किती बैठकांमध्ये ठराव घेण्यात आले. किती नवीन लाभार्थ्यांची नावे समाविष्ट करण्यात आली,याची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मयत लाभार्थ्यांच्या एटीएम कार्डद्वारे अद्याप अनुदान उचलले जात आहे.यासाठी केवायसी प्रक्रिया करून मयत लाभार्थ्यांची स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक आहे.मयत लाभार्थ्यांची अधिकृत नोंद कार्यालयाकडे आहे की नाही,त्यांचे आधार कार्ड व मतदान ओळखपत्र लिंक का करण्यात आलेले नाही,याबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.याशिवाय,इतर तालुक्यातील अथवा ठिकाणच्या रहिवाशांचे अनुदान आपल्या तहसीलमार्फत सुरू असल्याचा प्रकार समोर येत असून,यामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा अपहार होत असल्याचा आरोप सलीम बापू यांनी केला आहे. हे सर्व गैरप्रकार तात्काळ थांबविण्यात यावेत,या मागणीसाठी दि.२० जानेवारी मंगळवार रोजी तहसीलसमोर सामाजिक कार्यकर्ते सलीमबापू यांनी उपोषण सुरू केले आहे. सय्यद समीर,शेख इलियास,शेख मेहमूद,शिवाजी कुरे,मोमीन इस्माईल,बप्पा डोंगरे,शेख इमरान, सिद्दिकी जुनेद,सय्यद बाबू, सिद्दिकी अमन यांचा सहभाग होता.

# पाण्याची वितरण व्यवस्था व आठवड्याचे स्थायी वेळापत्रक तात्काळ करा -नगराध्यक्षा धर्माधिकारी

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

लोकनियुक्त नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी परळी नगर परिषदेच्या सर्व विभागांचा आढावा घेत कामकाजाला धडाक्यात सुरुवात केलेली आहे .नगर परिषदेच्या कामकाजातील प्रत्येक बाबींवर बारकाईने लक्ष देऊन सध्या त्या सविस्तर व सकारात्मक आढावा घेताना



दिसत आहेत. या अनुषंगाने त्यांनी आज नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचा आढावा घेतला. आवश्यक त्या बाबी, सूचना व करावयाची उपायोजना याबाबत त्यांनी पाणीपुरवठा विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांची सविस्तर चर्चा केली.

परळी वैजनाथ नगर परिषदच्या पाणीपुरवठा विभागाचा आढावा नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी आज घेतला. यावेळी डब्ल्यूटीपी () प्लॅन्ट नागापूर,मुख्य पाणीपुरवठा लाईन तसेच शहरातील वितरण व्यवस्था याबाबत कर्मचाऱ्यांचे प्रश्न जाणून घेत तात्काळ उपाययोजना करणे बाबत अधिकाऱ्यांना सूचना केल्या.परळी नगरीतील नळाच्या पाण्याची वितरण व्यवस्था व आठवड्याचे स्थायी वेळापत्रक करणे ◀◀ पान ३ वर

# गहिनीनाथ महाराज समाधीचे मूळ स्थान विकासापासून कोसो दूर

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचा मोठ्या प्रमाणावर विकास करण्यात आला असला, तरी या गडाचे मूळ केंद्र असलेल्या गहिनीनाथ महाराजांच्या संजीवन समाधीच्या मूळ स्थानाकडे प्रशासन व अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर येत आहे. नवनाथ संप्रदायातील एक महायोगी असलेल्या गहिनीनाथ महाराजांची जिवंत समाधी असलेले हे पवित्र स्थान आजही मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित आहे.

विकासाचा अभाव ठळक

तालुक्याच्या ठिकाणाहून गडाच्या दिशेने विकासकामे झाली असली, तरी प्रत्यक्ष मूळ समाधीपर्यंत जाणाऱ्या रस्त्यांची दयनीय अवस्था आहे. पिण्याच्या पाण्याची सोय नाही, भक्तनिवासाची सुविधा अपुरी आहे, तसेच स्वच्छता व वीजपुरवठ्याचाही अभाव आहे. परिणामी भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

हजारो भाविकांची श्रद्धा पण सुविधा शून्य

राज्याच्या कानाकोपऱ्यातून दरवर्षी हजारो भाविक गहिनीनाथ महाराजांच्या दर्शनासाठी येथे येतात. विशेषतः 'धर्मनाथ बीज' सोहळ्याच्या काळात मोठी गर्दी उसळते. मात्र, आवश्यक सुविधा नसल्याने वृद्ध, महिला व लहान मुलांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो.

संजीवन समाधीचे अनन्यसाधारण महत्त्व

नाथ संप्रदायातील नऊ महायोग्यांपैकी एक असलेल्या गहिनीनाथ महाराजांची ही संजीवन समाधी अत्यंत जागृत व चमत्कारी मानली जाते. अशा ऐतिहासिक, धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व असलेल्या स्थळाची झालेली दुरवस्था पाहून भाविकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ◀◀ पान ३ वर

# गणेश जयंती निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाईच्या देशपांडे गल्लीतील पुरातन वरद विनायक मंदिरात गुरू वार २२ जानेवारी रोजी गणेश जयंती निमित्त विविध धार्मिक उपक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळाच्या वतीने नमुद करण्यात आले आहे.



गणेश जयंती निमित्त गणेश याग,गणेश जन्म सोहळा तसेच दुपारी ह.भ.प.अंबादास महाराज चिक्षे यांचे किर्तन,महाआरती व नंतर प्रसाद असे विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत.वरद विनायक गणेश देवस्थानच्या वतीने गणेश जयंती निमित्तची आयोजनाची बैठक महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळाचे माजी अध्यक्ष पत्रकार राहुल देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळाचे कोषाध्यक्ष विश्वंभर गोस्वामी यांनी गणेश जयंती निमित्तच्या कार्यक्रमाची रूपरेषा व अहवाल ◀◀ पान ३ वर

# नवा ग्रामजी कायदा रद्द करून जूना रोजगार हमी कायदा मजबूत करा -शिवाजी कुरे

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र शेतमजूर व इतर ग्रामिण मजूर युनियन लाल बावटा माजलगाव तालुका कमिटी च्या वतीने आज माजलगाव तहसील कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. या निदर्शनाचे नेतृत्व संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी कुरे यांनी केले. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हम्मी कायदा, २००५ (मनरेगा) कायदा मजबूत करावा व या कायद्याला कमजोर करणारा व्हि बी ग्रामजी कायदा रद्द करावा अशी मागणी करण्यात आली.




जूना कायदा रोजगाराचा कायदेशीर हक्क मानणारा होता. त्यात दर वर्षी किमान १०० दिवस कामाची हमी, काम न मिळाल्यास बेरोजगारी भत्ता, केंद्र व राज्य यांचा ९०:१० असा खर्चाचा वाटा, ग्रामसभेची योजना नियोजनात मध्यवर्ती भूमिका अशा महत्त्वाच्या तत्त्वांवर तो आधारित होता.

केंद्र सरकारने हा अधिकार-आधारित ऐतिहासिक कायदा रद्द करून त्याऐवजी 'विकसित भारत- गॅरंटी फॉर रोजगार अँड आजीविका मिशन (ग्रामीण) तइ-ऋठ-च(ऋ) कायदा आणला आहे. हा कामगाराचा हक्क छीनण्याचा प्रकार आहे. मनरेगा अंतर्गत केंद्र व राज्य यांचा खर्चाचा वाटा ९०:१० होता. नव्या कायद्यात हे प्रमाण ६०:४० असे केले आहे. यावेळी महाराष्ट्र शेतमजूर व इतर ग्रामीण मजूर युनियन (लाल बावटा) चे जिल्हा सचिव कॉम्रेड सय्यद रजाक, तालुका अध्यक्ष रत्नाकर गोळेकर, सचिव उषा अवसे, बंडूराम गरड, शिवाजी कुरे, बळीराम भुंबे, विमल मुळे, सुभाष थोरात, शेषेरावय आबुज, महारुद्र घेणे, गायत्री गरड, अश्रुबा गाढवे, वैजिनाथ बांगर, लता केंद्रे, गोरख गोरे, विश्वनाथ राऊत यांच्यासह शेतमजूर व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ड्रग्ज देऊन आम्हाला संपवण्याचा प्रयत्न !

## पोलिसांची दुटप्पी भूमिका, पूजा खेडकरच्या वडिलांचे गंभीर आरोप

**पुणे । प्रतिनिधी**

बडतर्फ आयएएस अधिकारी पूजा खेडकरच्या (झेक्षर घहशवज्ञरी) पुण्यातील औंध परिसरातील नॅशनल हाऊसिंग सोसायटीमधील बंगल्यात रविवारी ११ जानेवारी रोजी मध्यरात्रीच्या सुमारास चोरी झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणात बंगल्यात काम करणाऱ्या एका नोकराने मध्यरात्री पूजा खेडकर यांना दोरीने बांधून ठेवले, असा आरोप करण्यात येत आहे. तसेच, त्यांचे वडील दिलीप खेडकर आणि आई मनोरमा खेडकर यांना गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध करण्यात आल्याचा गंभीर दावा करण्यात आला आहे. त्यानंतर चोरट्यांनी घरातील कपाटे फोडून मौल्यवान वस्तू लंपास केल्याचे सांगितले जात आहे. या संपूर्ण घटनेवर आता पूजा खेडकरचे वडील दिलीप खेडकर (ऊळश्रळि घहशवज्ञरी) यांनी धक्कादायक आरोप केले असून, या



चोरीमागे नेमके कोण आहे आणि घटना कशी घडली, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रकरणामुळे एकच खळबळ उडाली आहे.

दिलीप खेडकर म्हणाले की, आमच्या घरी केवळ चोरी झाली म्हणून पत्रकार परिषद घेत आहे. पोलिसानी दुर्लक्ष केले, आम्ही बनाव केला, असा गैरसमज पसरवला गेला. ड्रग्ज वापरून आमचा खून करण्याचा प्रयत्न झाला आहे. ते ड्रग्स पुण्यात कुठेच उपलब्ध नाहीत. आम्हाला पाच दिवस हॉस्पिटलमध्ये ट्रिटमेंट घ्यावी लागली. शेतात झालेल्या भांडणाची दखल घेतली जाते. पण, या जबरी चोरीची पोलिसांनी दखल घेतली नाही, असा आरोप त्यांनी केला. दिलीप खेडकर पुढे म्हणाले की, या प्रकरणात अजूनपर्यंत कोणताच तपास नाही. नको तेव्हा पुणे पोलीस गेटवरून आमच्या घरी येतात. पोलीस आयुक्त आमचे शस्त्रपरवाने रद्द करतात. पोलिसांची भूमिका दुटप्पी आहे. आम्हाला जीवे मारण्याचा प्रयत्न झाला आहे. लवकर उपचार मिळाले म्हणून आम्ही वाचलो आहोत. पोलिसांकडून हलगर्जीपणा केला जातोय. त्यांनी जर ठरवलं तर लगेच चोरांना पकडलं जाईल. पोलिसांचं रेट कार्ड देखील ठरलेलं असतं. शासन आणि प्रशासन काम करत नाही.आमच्या शेजारी राजभवन आहे. पोलीस अधीक्षकांचा बंगला आहे. आम्ही नोकर देखील चांगल्या कंपनीकडून घेतला होता. तरी पण त्यांनी बनाव करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. आमच्या कुटुंबाला प्रत्येक वेळी टार्गेट केलं जात आहे. साधा अपघात झाला असताना १५ दिवस पोलीस आमच्या घराबाहेर होते. गरज नसताना खंडणीचा गुन्हा दाखल केला जातो. पण, या प्रकरणात मात्र पोलीस भूमिका घेत नाहीत. बाहेरच्या देशातील लोक बाहेरून येवून अस करत असतील तर यंत्रणा काय काम करत आहे? या प्रकरणाची एस आय टी चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी दिलीप खेडकर यांनी केली. हिकमत शाहिद असं या आरोपीचे नाव असून तो नेपाळचा आहे. आमच्या घरात ७ लोक आले होते, बाहेर पण ७-८ लोक होते. सगळे मिळून १५ सराईत गुन्हेगार होते. चोरी करण्यासारखं घरात खूप काही होतं पण ठराविक गोष्टी घेवून गेले. ३-४ लाख रुपये कॅश आणि काही सोनं चोरीला गेलं आहे. आम्हाला प्लॅन करून मारण्यासाठी ते आले होते. एका महिन्यात आम्हाला त्या व्यक्तीवर संशय आला नाही. या घटनेमुळे मनोरमा खेडकर यांना खूप त्रास झालाय. आम्ही त्यांना अजून सगळं सांगितलं नाही. त्यांना चक्कर आली, असं सांगितलं आहे, असे देखील दिलीप खेडकर यांनी म्हटले.

# दौंड गॅस स्फोट प्रकरण: पाच कामगारांच्या मृत्यूनंतर हॉटेल व्यवस्थापक अटकेत

**दौंड । प्रतिनिधी**

दौंड-पाटस रोडवरील गिरीम गावच्या हद्दीतील हॉटेल जंगदंबामध्ये दि. ७ जानेवारी रोजी गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन दहा कामगार भाजले होते. त्यातील पाच जणांचा मृत्यू झाला आहे. या गंभीर घटनेप्रकरणी दौंड पोलिसांनी अखेर सोमवारी (दि. १९) मध्यरात्रीच्या सुमारास हॉटेल व्यवस्थापकाला अटक केली आहे. याबाबत दौंडचे पोलिस निरीक्षक गोपाल पवार यांनी माहिती दिली.

हॉटेलमधील स्फोटानंतर हॉटेलमालक किरण आबा सौताडे व व्यवस्थापक लहू विश्वनाथ जांभळे (दोघेही रा. राशीन, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) हे फरार झाले होते. मात्र, पोलिसांचा संथ तपासावर मोठी टीकेची झोड उठू लागली. त्यानंतर दौंड पोलिसांनी या हॉटेलचा व्यवस्थापक लहू विश्वनाथ जांभळे याला अटक केल्याची माहिती पोलिस निरीक्षक गोपाल पवार यांनी दिली. यावेळी गोपाल पवार म्हणाले, या व्यवस्थापकाकडून माहिती मिळाल्यानंतर त्यांनी घरगुती वापरण्याचा गॅस कोणाकडून घेतला होता व त्यांना घरगुती वापराचे एकदम १४ ते १५ सिलिंडर दिलेच कसे, अशा अनेक प्रश्नांची उत्तरे मिळणार आहेत. त्यानुसार दोषींवर कारवाई करण्यात येईल. दरम्यान, घटनेनंतर ८० टक्क्यांपेक्षा जास्त भाजलेल्या कामगारांना पुण्यातील ससून रुग्णालयात दाखल केले होते. त्यांना नातेवाईकांनी देखभालीचे कारण सांगत आपल्या गावी आग्रा येथे नेले. परंतु वाटेतच पाच जणांचा मृत्यू झाल्याचे दौंड पोलिसांनी सांगितले होते. आता याप्रकरणी राजकीय हस्तक्षेपाची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे या प्रकरणाचे पुढे काय होते हे पाहणे गरजेचे आहे.

# पुण्यातील प्रसिद्ध रामेश्वरम् कॅफेच्या मालकाच्या घरात चोरी; दुधवाल्यानेच मारला डल्ला

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील विमाननगर (तळारप परसरी) परिसरात प्रसिद्ध रामेश्वरम् कॅफेच्या (ठराशीहुरीरा उरषश) मालकाच्या घरात चोरी झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून, या प्रकरणात घरात नियमितपणे दूध टाकण्यासाठी येणाऱ्या दुधवाल्यानेच चोरी केल्याचे स्पष्ट झाले आहे. व्यंकटेश करंडे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या चोरीप्रकरणी विमाननगर पोलिसांनी (झेश्रळलश) आरोपीला अटक केली असून, त्याच्याकडून १ लाख ३२ हजार रुपयांची रोकड चोरीला गेल्याचे निष्पन्न झाले आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, रामेश्वरम् कॅफेच्या मालकाच्या घराला डिजिटल लॉक



बसवण्यात आले आहे. आरोपी व्यंकटेश करंडे हा गेल्या अनेक दिवसांपासून या घरावर पाळत ठेवून होता. घरात दूध टाकण्यासाठी येताना तो वारंवार डिजिटल लॉकचा पासवर्ड टाकून पाहत असल्याचे तपासात उघड झाले आहे. मात्र प्रत्येकवेळी त्याचा प्रयत्न फसत होता. अखेर १७ सप्टेंबर रोजी पहाटे साडेपाचच्या सुमारास आरोपीला डिजिटल लॉकचा अचूक पासवर्ड समजला. त्यानंतर त्याने घरात प्रवेश करून कपाटातील १ लाख ३२ हजार रुपयांची रोकड लंपास केली. चोरीनंतर तो तेथून पसार झाला. दरम्यान, घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये ही संपूर्ण घटना कैद झाली असून, त्याच आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने आरोपीची ओळख पटवून विमाननगर पोलिसांनी त्याला अटक केली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, घरात विश्वासाने येणाऱ्या व्यक्तीकडूनच चोरी झाल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. याप्रकरणी विमाननगर पोलीस पुढील तपास करत आहेत.

दरम्यान, पुण्यातून एक धक्कादायक प्रकार घडला आहे. ससून रुग्णालयातून सनी गौतम कुचेकर या आरोपीने सोमवारी (दि. १९) पलायन केल्याची घटना घडली आहे. फिटसारखे झटके येत असल्याने त्याला रविवारी वॉर्ड क्रमांक १६ मध्ये दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर प्रकृती सुधारताच त्याने पोलिसांची नजर चुकवून पलायन केल्याचे समोर आले आहे. आरोपीने स्वच्छतागृहाच्या काचा काढून, इमारतीच्या रंगकामासाठी उभारलेल्या बारच्या साहाय्याने पळ काढल्याची माहिती ससून प्रशासनाने दिली. बेड्यांमधून सुटका करून घेतल्याचा संशय असून, पलायनाचा क्षण सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे.

# जोरात धमाका करा, पैसे मी देतो; निलेश घायवळने 'या' दिवशी रचला गोळीबाराचा कट; पोलीस तपासात धक्कादायक माहिती समोर

**पुणे । प्रतिनिधी**

कुख्यात गुंड नीलेश घायवळ याच्या टोळीविरोधात पुणे गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत ९ आरोपींविरोधात तब्बल ६,४५५ पानी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. गणेशोत्सव विसर्जनाच्या दिवशी परिसरात दहशत निर्माण करण्यासाठी गोळीबाराचा कट रचण्यात आल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. कोथरूड परिसरात टोळीची दहशत कमी झाल्याने ती पुन्हा निर्माण करण्यासाठी नीलेश घायवळ याने आपल्या साथीदारांना, हमराज चौक, शास्त्रीनगर परिसरात जोरात धमाका करा, शस्त्र आणि पैसे मी पुरवतो. केस लागली तरी बाहेर काढतो, असे सांगितल्याचे दोषारोपपत्रात नमूद करण्यात आले आहे. हा कट ६ सप्टेंबर २०२५, गणेश विसर्जनाच्या दिवशी रचण्यात आला होता.

या कटानुसार १७ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास मुठेश्वर मित्रमंडळ चौकाजवळ गप्पा मारत उभ्या असलेल्या नागरिकांवर घायवळ टोळीतील गुंडांनी गोळीबार केला. या गंभीर गुन्ह्यात पोलिसांनी मोक्का (चउजउ-) अंतर्गत कारवाई केली आहे. या प्रकरणात मयूर ऊर्फ राकेश कुंबरे,




मयंक मॉन्टी व्यास, गणेश राऊत, दिनेश फाटक, आनंद चांदलेकर, मुसाब शेख, जयेश वाघ, अक्षय गोगावले आणि अजय सरोदे अशा ९ आरोपींवर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. या गुन्ह्यात ९ जणांना अटक करण्यात आली असून ८ आरोपी फरार आहेत. न्यायालयाने त्यांना फरार घोषित केले आहे. गुन्ह्यानंतर काही दिवसांतच मुख्य सूत्रधार नीलेश घायवळ परदेशात फरार झाला. त्याला पकडण्यासाठी इंटरपोलची मदत घेण्यात आली असून त्याच्याविरोधात रेड कॉर्नर नोटीस जारी करण्यात आली आहे. तपासादरम्यान आरोपींकडून १ पिस्तूल, १ रिकामी पुंगळी, घायवळच्या घरझडतीत २ जिवंत काडतुसे व ४ रिकाम्या पुंगळ्या जप्त करण्यात आल्या आहेत. आरोपींनी हा गुन्हा टोळीच्या व वैयक्तिक आर्थिक फायद्यासाठी संघटितपणे केल्याचे निष्पन्न झाले आहे. दरम्यान, नीलेश घायवळ आणि सचिन घायवळ यांनी कोथरूड परिसरात दोन बेकायदेशीर इमारती बांधल्याचेही तपासात समोर आले असून त्यांच्यावर कारवाईसाठी पुणे महापालिकेशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. या प्रकरणात आतापर्यंत १२२ साक्षीदार तपासण्यात आले असून ६ साक्षीदारांचे जबाब न्यायालयात नोंदवण्यात आले आहेत. गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे शहरातील संघटित गुन्हेगारीविरोधात मोठा धक्का मानला जात आहे.

# 'पुणे ग्रँड चॅलेंज सायकल' टूरदरम्यान भीषण अपघात; ७० हून अधिक सायकलपटू एकमेकांवर आदळले

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी गंभीर घटना आज मुळशी तालुक्यात घडली. 'पुणे ग्रँड चॅलेंज सायकल टूर' दरम्यान मुळशी-कोळवण रस्त्यावर झालेल्या साखळी अपघातात ७० हून अधिक सायकलपटू एकमेकांवर आदळले, यामध्ये अनेक खेळाडू जखमी झाले आहेत.

ही आंतरराष्ट्रीय दर्जाची सायकल स्पर्धा कोळवण रोडवरून सुरू असताना, रस्त्याची रुंदी अचानक कमी झाल्याने हा अपघात घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. ताशी ६० ते ७० किमी वेगाने धावणाऱ्या सायकलपटूंना अरुंद रस्ता आणि तीव्र वळणाचा अंदाज न आल्याने आघाडीच्या सायकलपटूचा ताबा सुटला. यानंतर मागून येणारे खेळाडू एकामागोमाग एक एकमेकांवर आदळले आणि काही



सायकलपटू ट्रॅकच्या बाहेर फेकले गेले.

या साखळी अपघातात अनेक खेळाडूंना किरकोळ दुखापती झाल्या असून ४ ते ५ सायकलपटूंना गंभीर जखमा झाल्याने त्यांच्यावर तातडीने वैद्यकीय उपचार करण्यात आले. घटनेनंतर सुमारे १५ मिनिटांसाठी स्पर्धा थांबवण्यात आली, त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर रेस पुन्हा सुरू करण्यात आली.

प्रशासनाच्या नियोजनावर संताप.आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा आयोजित करताना रस्त्यांची भौगोलिक स्थिती, अरुंद वळणे आणि सुरक्षेच्या उपाययोजनांचा योग्य अभ्यास करण्यात आला होता का? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

कोळवण रोडवरील अरुंद भागाची पूर्वसूचना खेळाडूंना देण्यात आली नव्हती, असा आरोप केला जात आहे. तसेच वळणावर आवश्यक असणारी बॅरिकेडिंग, धोक्याच्या सूचना देणारे फलक आणि सुरक्षाकर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्याचेही दिसून आले.

# अपघातानंतर मोटारचालक महिलेने तरुणाला फरफटत नेले; मोटार चालक महिला अटकेत

**पुणे । प्रतिनिधी**

संगमवाडी ते येरवडा रस्त्यावर किरकोळ अपघातानंतर मोटारचालक महिलेने एकाला फरफटत नेले. समाज माध्यमातून या घटनेची चित्रफीत प्रसारित झाल्यानंतर पोलिसांनी मोटारचालक महिलेला अटक केली.

या प्रकरणी मोटारचालक महिला मेरसेदे रसुलीफर (४५) हिला अटक करण्यात आली. या घटनेत राम लक्ष्मण राठोड (३४) हे जखमी झाले.



याप्रकरणी लक्ष्मीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती लक्ष्मीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोटारचालक महिला शनिवारी (१७ जानेवारी) येरवड्यातील सादलबाब दर्गा रस्त्याने संगमवाडीकडे निघाली होती. त्या वेळी तेथून निघालेल्या मोटारचालक राम राठोड याच्याबरोबर किरकोळ अपघातानंतर वाद झाला. राठोड याने मोटार थांबवून मोटारचालक महिला मेरसेदे हिला मोटारीतून बाहेर येण्यास सांगितले. तिने मोटार सुरू ठेवली. मोटारीच्या समोर राठोड थांबले. मोटार सुरू ठेवल्याने राठोड यांनी मोटार अडविण्याचा प्रयत्न केला. मोटारचालक महिलेने मोटार पुढे नेली. प्रसंगावधान राखून राठोड यांनी बोनेट धरून ठेवले. मेरसेदे हिने मोटार दोन किलोमीटर पुढे नेली. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर तिला अटक करण्यात आली.

# जुन्नरमध्ये शिवसेना (ठाकरे)-दोन्ही राष्ट्रवादीचं जमलं

**नारायणगाव । प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यात आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शप) आणि शिवसेना (उबाठा) हे तिन्ही पक्ष एकत्रितपणे 'घड्याळ' या चिन्हावर लढवणार आहेत. नारायणगाव येथे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ही महत्त्वाची घोषणा करण्यात आली. यावेळी माजी आमदार अतुल बेनके, सभापती संजय काळे आणि महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

खासदार कोल्हे यांनी सांगितले की, पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढल्याचा फायदा पक्षाला झाला आहे. याच धर्तीवर राज्यातील १२



जिल्हा परिषदांच्या निवडणुकांमध्ये मतांची विभागणी टाळण्यासाठी शरद पवार आणि अजित पवार यांनी बारामती येथील बैठकीत एकत्र लढण्याचा निर्णय घेतला आहे. समविचारी मतांचे ध्रुवीकरण रोखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून, जुन्नरमध्ये महाविकास आघाडीचे पूर्ण ताकदीने काम करण्याचे नियोजन आहे. खेडमध्ये शिवसेना उबाठासोबत चर्चा सुरू असून शिरूर आणि हवेलीबाबत दोन दिवसांत अंतिम निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी माजी आमदार अतुल बेनके यांनी इशारा दिला की, अधिकृत उमेदवारांच्या विरोधात काम करणाऱ्या किंवा पक्षविरोधी कृती करणाऱ्या कार्यकर्त्यांवर कडक कारवाई केली जाईल. तालुक्यातील जागावाटपाचे सविस्तर सूत्र येत्या दोन दिवसांत जाहीर करण्यात येणार आहे. आंबेगाव तालुक्यात मात्र काही कारणास्तव एकमत होत नसल्याने तिथे वेगळा निर्णय घेतला जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेला पांडुरंग पवार, तुषार थोरात, शरद चौधरी, अनंतराव चौगुले, गुलाब पारखे आणि पूजा बुट्टे पाटील यांसह मान्यवर उपस्थित होते.

# आता घरबसल्या मिळवा पीएमआरडीएचे दाखले

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) नागरिकांना अधिकाधिक सेवा ऑनलाइन देण्यावर भर दिला आहे. त्यानुसार विविध दाखले, परवानग्या आणि प्रमाणपत्रांसाठी आता नागरिकांना कार्यालयांचे हेलपाटे मारण्याची गरज उरलेली नाही. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमानुसार प्रशासनाने २९ महत्त्वाच्या सेवा पूर्णपणे ऑनलाइन केल्या असून, आता या सेवांसाठी कोणताही ऑफलाइन अर्ज स्वीकारला जाणार नाही, असे परिपत्रक प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी जारी केले आहे.

प्राधिकरणाचा विस्तार खूप मोठा आहे. प्राधिकरणाच्या हद्दीत सुमारे ८०० गावांचा समावेश होतो. प्राधिकरणाचे कार्यालय हे आकुर्डी येथे आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना कोणत्याही कामकाजासाठी या कार्यालयात अर्ज करावा लागत होता. त्यामुळे नागरिकांना अर्ज करण्यासाठी आणि त्यानंतर दाखले घेण्यासाठी यावे लागत होते. या सर्व पार्श्वभूमीवर अधिकाधिक सेवा नागरिकांना घरपोच कशा देता येतील, यासाठी प्राधिकरणाने ऑनलाइन सेवा देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार दाखले, प्रमाणपत्र अशा एकूण २९ सेवा ऑनलाइन उपलब्ध करून दिल्या आहेत. या निर्णयामुळे




पीएमआरडीएच्या कामकाजात सुसूत्रता, वेग आणि पारदर्शकता येणार आहे. घरबसल्या सेवा उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांचा वेळ आणि श्रम वाचणार आहेत. लोकसेवा हक्क कायद्याच्या चौकटीत या सेवा येत असल्याने ठराविक कालमर्यादेत सेवा देणे प्रशासनासाठी बंधनकारक झाले आहे. ज्यामुळे प्रलंबित प्रकरणांचा निपटारा लवकरात लवकर होण्यास मदत होणार आहे.

या सेवा मिळणार ऑनलाइन

तात्पुरती रेखांकन परवानगी, जोते प्रमाणपत्र, नूतनीकरण परवानगी, झोन दाखला, भाग नकाशा, आकाशचिन्ह परवाना, अग्निशमन परवाना, पर्यावरण प्रमाणपत्र, जमीन व मालमत्ता विभागाशी संबंधित सदनिका किंवा भूखंडांचे हस्तांतरण, वारस नोंद, कर्जासाठी लागणारे ना-हरकत प्रमाणपत्र आणि भूखंडांची फेरमोजणी आदी सेवा या ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सेवांचा लाभ घेण्यासाठी पीएमआरडीएच्या संकेतस्थळावर नागरिकांना अर्ज करावा लागणार आहे.


ऑफलाइन अर्ज स्वीकारल्यास कारवाई

पीएमआरडीएने नागरिकांना अधिकाधिक सुविधा या ऑनलाइन उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. या २९ सेवा आता केवळ डिजिटल स्वरूपातच उपलब्ध असतील. जर कोणत्याही विभागाने ऑफलाइन पद्धतीने अर्ज स्वीकारल्याचे निदर्शनास आले, तर संबंधित विभागप्रमुखांना थेट जबाबदार धरून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचा इशारा प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. म्हसे यांनी दिला आहे.

# मावळात भाजपा-राष्ट्रवादी आमनेसामने; युतीला स्पष्ट नकार

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात थेट सामना होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेससोबत कोणत्याही परिस्थितीत युती केली जाणार नाही, अशी ठाम भुमिका भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी राज्यमंत्री संजय भेगडे यांनी सोमवारी (दि. १९) आयोजित पत्रकार परिषदेत स्पष्ट केली. भाजप कार्यालयात झालेल्या या पत्रकार परिषदेमुळे मावळ तालुक्यातील राजकीय वातावरण अधिक तापले असून निवडणूक लढत तीव्र होण्याचे संकेत मिळाले आहेत. भेगडे यांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील शेळके यांच्या जुन्या वक्तव्याचा उल्लेख करत, तळेगाव दाभाडे नगरपरिषद निवडणुकीत भाजपसोबत युती करून चूक झाली, असे आमदार शेळके यांनी जाहीरपणे मान्य केले होते. त्यामुळे पुन्हा राष्ट्रवादीसोबत युती करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असा स्पष्ट संदेश दिला आहे.




भाजपने या निवडणुकीसाठी शिंदेंची शिवसेना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांच्यासोबत महायुती करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती भेगडे यांनी दिली. त्यानुसार शिंदेंच्या शिवसेनेला पंचायत समितीच्या टाकवे गणातून, तर रिपब्लिकन पार्टी आठवले गटाला खडकाळे गणातून उमेदवारी देण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

महायुतीची पहिली यादी जाहीर

पत्रकार परिषदेत महायुतीच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. इंदोरी-वराळे जिल्हा परिषद गटातून मेघा प्रशांत भागवत यांना भाजपकडून अधिकृत उमेदवारी देण्यात आली असून, यामुळे या गटातील लढत अधिक रंगतदार होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

त्यासोबतच इंदोरी गणातून श्रीकृष्ण अण्णासाहेब भेगडे, वराळे गणातून रवींद्र निवृत्ती शेटे, चांदखेड गणातून सुवर्णा बाळासाहेब घोटकुले, उर्से गणातून बाळासाहेब नथू पारखी, काले गणातून सीमा मुकुंदराव ठाकर, कार्ला गणातून रंजना सुरेश गायकवाड, टाकवे गणातून अश्विनी सोमनाथ कोंडे (शिंदेसेना) यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

शक्तीप्रदर्शनाची तयारी

महायुतीकडून पंचायत समितीच्या गणनिहाय उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहे. उर्वरित उमेदवारांची घोषणा मंगळवारी संध्याकाळी करण्यात येणार असल्याची माहिती देताना भेगडे यांनी सांगितले की, मंगळवारी वडगाव मावळ येथे महायुतीच्या सर्व १५ उमेदवारांचा संयुक्त अर्ज भरण्यासाठी मिरवणूक काढण्यात येणार आहे. या शक्तिप्रदर्शनातून महायुतीची ताकद दाखवली जाणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत. या पत्रकार परिषदेनंतर मावळ तालुक्यातील राजकीय हालचालींना वेग आला असून, आगामी निवडणुकीत महायुती विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस अशी थेट लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत प्रचार अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसून येत आहेत.